# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १८/०१/२०१६**

मा. महासभा शुक्रवार दि. ०४/१२/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत पुरक घोषणा क्र. ११७ ते १२८ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार, दिनांक १८/०१/२०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १५) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १६) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १७) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १८) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २०) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २१) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २२) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २५) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २६) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३०) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३३) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३४) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३५) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३६) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३७) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३८) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३९) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ४०) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४१) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४२) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४३) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४४) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४५) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४६) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४७) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४९) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ५०) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५१) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५२) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५३) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५४) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५७) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५८) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५९) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६०) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६१) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ६२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६५) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६६) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६८) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६९) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७०) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७१) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७२) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७३) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७४) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७५) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७६) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७७) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७८) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७९) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८०) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८१) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८२) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८३) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८४) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८५) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८६) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८८) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ८९) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| २) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ३) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| ६) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| २) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |

**नगरसचिव :-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा शुक्रवार दि. ०४/१२/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत पुरक घोषणा क्र. ११७ ते १२८ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **सोमवार, दिनांक १८/०१/२०१६ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. प्रकरण क्र. ११७, सन्मा. सदस्या श्रीम. दिप्ती शेखर भट्ट यांचा दिनांक २४/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. – १) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करणे. २) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व ठिकाणच्या उद्यानामध्ये झाडांबाबत योग्य तो निर्णय घेणेबाबत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या श्रीम. दिप्ती भट्ट ह्या सभागृहामध्ये आलेल्या उपस्थित नसल्याने प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११८, सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांचा दिनांक २४/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- प्रशासनाने कार्यादेश देऊनही वेळेत काम न करणाया ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणेबाबत.

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत विविध विकास कामांना मंजूरी मिळून प्रशासनाने कार्यादेश देऊनही ठेकेदार ती कामे करण्यास दिरंगाई करत आहेत. वेळोवेळी सुचना देऊनही ठेकेदार आपली मनमानी करत असून त्यामुळे विकास कामांना खिळ बसत आहे. अशा ठेकेदारांवर कडक कारवाई करुन त्यांची नावे काळ्या यादीत टाकण्यात यावीत व त्यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकासकामे देण्यात येऊ नये असा ठराव मांडत आहे. महापौर मॅडम, मिरा भाईंदर क्षेत्रातील विविध विकास कामांसाठी आपण पत्र दिलेले असताना त्या कामांना मंजुरी दिल्यानंतर निविदा काढून ते कामाला सुरुवात करण्यापर्यंत ठेकेदारांना किती वेळ दिला जातो. निविदा काढल्यानंतर पुन्हा ते काम चालु झाल्यानंतर निविदा वर्क ऑर्डर दिल्यानंतर ते काम चालु करेपर्यंतची प्रोसीजर किंवा ठेकेदारांना किती वेळ दिला जातो याची माहिती मला देण्यात यावी.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, अभी आयुक्त के सिट के ऊपर मा. आयुक्त (मुख्यालय) बैठे है। मेरे खयालसे यह इनकी पहली महासभा है। सभी सदस्यों को इनका परिचय भी मालुम नही होगा तो एकबार उनका सभी सदस्यों के सामने परिचय करवा दे।

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया व सन्मा सदस्य सर्वांना नमस्कार मी विजयकुमार म्हसाळ दि. १८/१२/२०१५ ला मी उपायुक्त मुख्यालय या पदावर जॉईन केले आहे. मी बी.ई. मेकॅनिकल एम.बी. आहे. मी ९५ पासून मुंबई कॉर्पोरेशनमध्ये सब. इंजिनिअर या पदापासून कामाला सुरुवात केली. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये विविध नगरपालिकामध्ये मी मुख्याधिकारी उपायुक्त कार्यरत आहे. आणि आपल्या या महानगरपालिकामध्ये १८ डिसेंबर पासून कार्यरत आहे. या महानगरपालिकेत चांगले काम करण्याचा मनोदय आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. धन्यवाद.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, संक्रांत झालेली आहे आणि तिळगुळचे लाडु आपण वाटले पाहिजे. आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा होती की तुम्ही सांगणार तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला. आमचे तिळगुळ सांडू नका आमच्याशी कधी भांडू नका. आम्हीच तुम्हाला तिळगुळ देतो.

**मा. महापौर :-**

पुढच्या सभेत आपल्याला तिळगुळ देण्यात येतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हाला माहिती होते की तुम्ही विसरणार?

**मा. महापौर:-**

हे बघा तुम्ही द्या आम्ही द्या, खायच आणि गोड गोड बोलायचे ना. तुम्ही मागवून घ्या आम्ही खाऊन टाकू.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम नविन वर्ष लागले आहे. संक्रात चालू आहे. ३१ जानेवारीपर्यत आहे. माझ्या परिवाराकडून या सगळया सदस्यांना सक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा देतो. तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला तिळगुळ सांडू नका आमच्याशी भांडू नका. मा. आयुक्त महोदय आपण पण ऐका.

**निलम ढवण :-**

खांबित साहेब ज चा प्रस्ताव होता माझ मागच्या तहकूब सभेला ३-४ महिण्यापासून वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर देखील निविदा कामाची त्या कामाची सुरूवात ठेकेदार करत नाही तर त्या संदर्भात आपल्याला देखील त्याची माहिती असणार तर का करत नाही ? आणि त्यानंतर निविदा मागितल्यानंतर निविदांचा पिरेड किती असतो त्यानंतर यांना वर्क ऑर्डर किती दिवसांत मिळते वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर त्यांनी किती दिवसात कामाला सुरूवात करावी या संदर्भातली माहिती द्यावी.

**दिपक खांबित :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की आपल्या टेंडर मध्ये स्पष्ट तरतूद आहे की कार्यादेश दिल्यानंतर त्या कंत्राटदाराने १५ दिवसाच्या आत काम सुरू करायचे आहे. ह्याबाबत मा. आयुक्तांनी तुम्ही प्रश्न दिल्यानंतर एक आदेश काढला आहे. की, कुठल्याही कंत्राटदाराने काहीही कारण नसताना आणि वर्क ऑर्डर दिल्यानंतर जर सात दिवसात कामास सुरूवात नाही केली , सात दिवसामध्येच उद्घाटन करून ते करायचे आहे. उद्घाटन जरी नाही झाले तरी सात दिवसानंतर ह्याने कामाला सुरूवात करायची आणि जर नाही केले तर त्या ठेकेदाराची इ.एम.डी. रद्द करायचे आणि ते ब्लॅकलिस्ट मध्ये टाकून ब्लॅकलिस्ट म्हणजे डिजीटल सिनियरटीची रद्द करून त्यानंतर ते फेर निविदा मागवायची अशी साहेबांनी आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच तुमचा दुसरा एक प्रश्न होता की आम्हाला कार्यादेश दिला आहे त्याबाबत सुध्दा आयुक्त साहेबांनी आदेश काढला आहे की, कार्यादेश दिल्यानंतर संबधित नगरसेवकांना लगेच तुम्ही कळवायचे आहे की या ठेकेदाराला अस अस कार्यादेश दिलेला आहे त्याची अंमलबजावणी सुध्दा आम्ही या महिण्यापासून करतोय. जे जे वर्क आऊट देवू ते लगेच आम्ही नगरसेवकांना त्याची माहिती देवू.

**निलम ढवण :-**

ठिक आहे पण साहेब तुम्ही ऑर्डर दिल्यानंतर देखील मी पाहिले आहे की लेटर आम्हाला पोचतायेत की अस अस काम सुरू केलेले आहे. किंवा इतक्या दिवसात होईल ही तुमची लेटर आम्हाला मिळतायेत परंतु तुम्ही ऑर्डर दिल्यानंतर ही ठेकेदार करत नसतील तर त्याच्यावर आजपर्यंत किती कारवाई झाली आहे.

**दिपक खांबित :-**

आजपर्यंत नाही केली पण याच्यापुढे आम्ही स्ट्रिक्ट कारवाई करू. आता आयुक्त साहेबांनी सुध्दा आदेश काढलेत त्यामुळे चालू वर्षापासून आम्ही यावरती स्ट्रिक्ट कारवाई करू. काही कारण नसताना म्हणजे जागेचे प्रॉब्लेम नसताना काही नसताना ठेकेदार जर नुसते वर्क ऑर्डर घेऊन ठेवत असतील आणि काम सुरू करत नसतील तर त्यावर नक्कीच कारवाई केली जाईल.

**निलम ढवण :-**

वर्क ऑर्डर निघाल्यानंतर किती महिण्याच्या आत त्यांच काम पूर्ण व्हावे.

**दिपक खांबित :-**

त्याची मुदत असते एक महिना दोन महिना त्या पिरेड मध्ये

**निलम ढवण :-**

त्या पिरेड मध्ये कारण बरीचशी कामे माझ्या माहितीनुसार आहेत मागच्या ३-४ महिण्यापासून वर्क ऑर्डर निघालेली आहेत परंतू अदयापी त्या कामाना सुरूवात नाही. काही कामांना मी लेटर दिल्यानंतर सुरूवात झालेली आहे म्हणजे स्पेशली मी माझ्या कामाच्या बाबतीत म्हणते ती काम सुरूवात झालेली आहे. परंतु बरीचशी अजुनही अशी कामे आहेत की रेंगाळलेली आहेत त्या ठेकेदारांना आपण फोन केले. सन्मा नगरसेवकांनी तर ते साधे फोन पण उचलत नाही. हे ठेकेदाराचे काय चालले आहे मग त्या ठेकेदारांवर काय कारवाई करणार तुम्ही.

**दिपक खांबित :-**

अशी बाब जर निर्दशनास आली याच्यापुढे तर त्यांच्यवर ही कारवाई केली जाईल.

**निलम ढवण :-**

म्हणजे त्यांना काहीच हे नाही की काम कुणाची चालली आहे किंवा कुणी वर्कऑर्डर दिली. त्यांनी त्यांना रिस्पॉन्स दिला पाहिजे ना.

**दिपक खांबित :-**

त्यांना मुदत दिली आहे त्याच्यामध्ये कामे सुरू करायची आहे आणि उद्घाटन होवो न होवो आम्ही याच्यापुढे स्ट्रिक्टली कामे सुरू करणार सात दिवसाच्या आतमध्ये.

**निलम ढवण :-**

सुरूवात करतांना त्या त्या संबधीत नगरसेवकांना सुचना

**दिपक खांबित :-**

लेखी कळवणार तुम्हाला

**निलम ढवण :-**

तुम्ही कळवणार पण ठेकेदार जेव्हा येतात तेव्हा ज्यांनी काम केलेली नसतील त्या त्या वॉर्डचे नगरसेवक असतात त्या ठेकेदारांनी देखील कॉन्टॅक्ट केले पाहिजे. संबंधितांना कळविले पाहिजे.

**दिपक खांबित :-**

आम्ही प्रशासनामार्फतच यापुढे कॉन्टॅक्ट करू मॅडम.

**निलम ढवण :-**

तशी सुचना ठेकेदारांनी देण्यात यावी अशी मी विनंती करते.

**प्रकरण क्र. ११८ :-**

सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांचा दिनांक २४/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- प्रशासनाने कार्यादेश देऊनही वेळेत काम न करणाया ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणेबाबत.

**ठराव क्र. ८९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत विविध विकास कामांना मंजूरी मिळून प्रशासनाने कार्यादेश देऊनही ठेकेदार ती कामे करण्यास दिरंगाई करत आहेत. वेळोवेळी सुचना देऊनही ठेकेदार आपली मनमानी करत असून त्यामुळे विकास कामांना खिळ बसत आहे. अशा ठेकेदारांवर कडक कारवाई करुन त्यांची नावे काळ्या यादीत टाकण्यात यावीत व त्यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकासकामे देण्यात येऊ नये असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. निलम ढवण** **अनुमोदक :- श्रीम. अनिता परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११९, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेच्या वन विभागामार्फत केलेल्या ४५० झाडांचे पुनःरोपण बाबत.

**मा. महापौर :-**

एक मिनिट ध्रुवकिशोर पाटीलजी आपल्याला कुठल्याही एक वरच चर्चा करता येणार म्हणजे तुम्हाला जर हाच विषय घ्यायचा असेल तर ठिक आहे नाही तर पुढचा विषय चर्चेला मिळणार नाही तुम्ही तर सिलेक्ट करायला बघत असाल तर तसं सिलेक्ट करून सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अस कशामुळे काय रिझन काय याच्यामागे जुबेरजी. नाही नाही विषय असा आहे गटनेत्यांनी काही डिसीजन घेतला तो आम्हाला मान्य आहे अस नाहीए साहेब हा जो ‘‘ज चा प्रस्ताव आणलाय हा आमचा अधिकार आहे ना.

**भगवती शर्मा :-**

अधिनियम के अंतर्गत है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ या अंतर्गत १ ‘‘ज’’ अन्वये आपण प्रस्ताव देवू शकतो आणि त्याप्रमाणेच दिलेला आहे मॅडम. पण आता उद्या समजा आमचे गटनेते सांगतील तुम्ही एकच प्रस्ताव द्यायचा ही चुकीची बाब आहे ना. मग उद्या तुम्ही गटनेत्याला घेऊनच महासभा चालु करा. आमची काही गरजच नाही ना. सगळ्या सदस्यांची तुम्हाला गटनेते घ्या आणि त्यांचेच डिसीजन घ्या.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब अस करु शकतो का? तुम्ही सांगा. ठिक आहे महापौरांनी सांगितले आहे की जे काही गटनेता असतील त्यांनी डिसीजन घेतला पण आम्ही अधिनियमाच्या अंतर्गत आम्ही ‘‘ज’’ चे प्रस्ताव मांडतो त्याच्यामध्ये जे हे डिसीजन घेतले महापौर मॅडमने ते नियम आम्हाला बाध्य आहे का? सांगा ना तुम्ही.

**नगरसचिव :-**

जे अधिनियमाप्रमाणे कामकाज आहे त्याप्रमाणे चालेल अधिनियम, उपविधी दोन्हीना धरुन कामकाज चालेल.

**भगवती शर्मा :-**

बस आम्ही तेच त्याप्रमाणे घेणार.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, अधिनियमात जे अधिकार दिले ते उपविधित आहे का आणि असेच फेरबदल असल्या कारणाने तर तो विषय गटनेत्यांच्या मिटींगमध्ये ठरल्यानंतर तो महासभेसमोर आला याची कार्यपध्दती पूर्णपणे अवलोकन करुन त्याचा सूचना हरकती मागविल्यानंतर ते तुम्हाला परत शासनाकडे पाठवावे लागेल तहकुबीनंतर त्यात फेरफार करायचे असेल तर.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाही जुबेरजी कही ऐसा तो नही की आपकी सेंटींग हो गई है।

**शरद पाटील :-**

सदरचा विषय फेटाळण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव मांडतो ना.

**मा. महापौर :-**

ठराव मांडा ना मग.

**भगवती शर्मा :-**

नाही मॅडम चर्चा करुन ठराव मांडतो ना. चर्चा पण करु देणार नाही तुम्ही.

**मा. महापौर :-**

विषय फेटाळला ना आता तुम्हाला मतदान पाहिजे तर घ्या.

**भगवती शर्मा :-**

मॅडम विषय आमचा आहे ना. तर चर्चा नाही करणार?

**मा. महापौर :-**

फेटाळले ते चर्चा नाही करायची असे ..........

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही फेटाळू कस शकता? चर्चा करुन ठराव करता येतो ना फेटाळू कस शकता. चर्चा होऊ द्याना त्याची.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही घाबरता का चर्चा करायला?

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, त्यांना वाटत असेल चर्चा करायची तर पहिला तो ठराव मांडायचा. विषय ठेवायचा की नाही सभागृहाला पटल आहे की हा विषय फेटाळण्यात यावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आपल्याला ठराव मांडायचा असेल तर मांडा नाहीतर मी दुसरा विषय घेते.

**भगवती शर्मा :-**

नाही चर्चा पण करुन देणार नाही तुम्ही.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आप लोग डरते क्यों है चर्चा करने के लिए समजता नही आपके पास इतनी मेजोरीटी है, हमारे पास मेजोरीटी नही है फिर भी डरते क्यों है? मॅडम ज्या चुकीच्या गोष्टी आहेत, ज्या चुकीच्या वेळी झालेल्या आहेत त्या तुमच्या निदर्शनास आणतोय. मॅडम, आम्ही पत्र दिले आहे. या पत्राचे अजिबात उत्तर दिले नाही. काही कारवाई झाली नाही प्रश्न आम्ही "ज" च्या माध्यमातून आणला आहे. मग आम्ही हे पण करु शकत नाही का? म्हणजे अशी गत झाली आई जेवू देत नाही आणि बाप भीक मागू देत नाही अशी गत झालेली आहे. म्हणजे आपण बोलु देत नाही आणि प्रशासन काम करत नाही. अस चालणार का? असं तुमचे राज्य आहे का?

**मा. महापौर :-**

सचिव साहेब त्यांना जरा नियम सांगा. फेटाळलेल्या विषयावर चर्चा होऊ शकते का?

**नरेंद्र मेहता :-**

या विषयावर आम्हाला चर्चा नकोच.

**भगवती शर्मा :-**

कोई गलत काम हुआ है उसका प्रशासन से उत्तर तो लेना पडेगा ना।

**मा. महापौर :-**

चर्चा करायची ठराव मांडायचा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

चर्चा पण करायची आणि ठराव पण करायचा मॅडम.

**मा. महापौर :-**

पहिले ठराव मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ओके मॅडम, पहिले ठराव मांडतो.

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोर पाटील साहेब मी फक्त हे सांगते यांनी एक ठराव मांडला की चर्चा करु द्यायची नाही हा विषय फेटाळला. आता तुम्हाला विषय जर आणायचा असेल तर परत तुम्ही तसा एक ठराव मांडा.

**भगवती शर्मा :-**

मॅडम, तुम्ही सचिव साहेबांना विचारा काय नियम आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पहिला प्रस्ताव मांडायचा अधिकार माझा आहे मॅडम.

**मा. महापौर :-**

पण त्यांना हे ठराव मांडायचा.

**भगवती शर्मा :-**

आम्ही विषय धरुन ठराव मांडणार.

**मा. महापौर :-**

ठिक आहे मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर शहरातील रस्ता रुंदीकरण, नवीन रस्ते बनविणे व नाल्याचे बांधकाम करताना त्या मध्ये येणारी सुमारे ४५० झाडांचे पुनःरोपण करण्याचे कार्यादेश पालिकेच्या वृक्ष-प्राधिकरण विभागामार्फत दिले होते. वृक्ष-प्राधिकरण विभागाने ठेकेदारांमार्फत झाडांचे पुनःरोपण ज्या ठिकाणी झाले आहे, तेथील पालिकेच्या सन्मा. सदस्यांच्या म्हणन्या नुसार त्या प्रभागात झाडाचे पुनःरोपण झालेलाच नाही. ही बाब अतिशय गंभीर असून पालीकेचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे व पर्यावरणाचे सुध्दा नुकसान झाले आहे. नुकतेच नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान ते मुर्धा खाडी (उत्तन रोड) येथे नाल्याचे बांधकाम करताना व प्लेझंट पार्क ते एमआयडीसी रोड येथील डेल्टा पार्क जवळ रस्त्या तयार करताना झाडे कापून रस्त्यावर टाकले आहे. मा. आयुक्तांने या बाबत कोणतीही तपासणी व कार्यवाही केली नसल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधीतांच्यावर खोटी माहिती व वरिष्ठांची दिशाभूल केल्याबद्दल कायदेशीर कार्यवाही करावी व झालेले आर्थीक नुकसान संबंधीत अधिका-यांकडून त्यांचा वेतनामधून वसूल करण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, सभागृहामध्ये "ज" च्या विषयावरती चर्चा करता येते का विनंती करण्यात येते की ठराव मांडण्यात येतो. काय प्रकार आहे सचिव साहेब.

**नगरसचिव :-**

ज्याचा ठराव त्याला चर्चा करता येते. त्याचा प्रस्ताव मांडता येतो. दोन्ही ठरावाचे मतदान घेता येईल.

**प्रशांत दळवी :-**

"ज" च्या प्रस्तावाला ठराव करता येतो का?

**नगरसचिव :-**

अजेंडावर विषय आलेला आहे. त्याच्यावर ठराव होईल हा रेग्युलर अजेंडा आहे आपला.

**प्रशांत दळवी :-**

सचिव साहेब "ज" च्या प्रस्तावाला आपण विनंती करतो की माझा हा "ज" चा प्रस्ताव पुढील महासभेस चर्चेसाठी घेण्यात यावे म्हणून अशा प्रकारची विनंती असते त्यामध्ये.

**नगरसचिव :-**

तसा ठराव करा.

**प्रशांत दळवी :-**

त्यांनी सरळ ठराव करुन मोकळे झाले ना ते तस होऊ शकते का?

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब कशाला उगाच काहीही उत्तर देता.

**प्रशांत दळवी :-**

"ज" च्या प्रस्तावाला आपण सभागृहाला विनंती करतो, महापौरांना विनंती करतो याच्यासाठी की ते पुढच्या महासभेत घेण्यात यावे यात चर्चा करावी. ते सरळ-सरळ ठराव असे कसे सचिव साहेब.

**भगवती शर्मा :-**

जब एक बार विषयपत्रिका पे विषय आ जाता है ...............

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११९ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. शरद पाटील, अनुमोदन श्री. राकेश शहा. दुसरा ठराव सुचक ध्रुवकिशोर पाटील.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब,एक मिनिट आयुक्तांना उत्तर देऊ द्या ना. जे काही आक्षेप आहे त्यावर उत्तर देऊ द्या ना. आम्हाला समाधान होऊ द्या.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, महानगरपालिकेचे कायदेविषयक सल्लागार आपल्याला उत्तर देत आहेत ते कायदेशीर उत्तर देतात ते ऐका ना.

**भगवती शर्मा :-**

ते ऐकले आमच्या विषयावर तुमचे उत्तर पाहिजे साहेब. जे आम्ही ठराव मांडले आहे त्याच्यामध्ये आमची जी तक्रार आहे त्याच्याबद्दल तुमच्याकडून आम्हाला उत्तरची अपेक्षा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांचा विषय आम्ही ठराव मांडला फेटाळण्यात यावे. सन्मा. सदस्यांनी ठराव मांडला त्या विषयावर चर्चा होण्यासाठी किंवा त्यांचा विषय घेण्यात यावा. एखादे ज्यावेळी विषय आपण नंतर शेवटी तो या विषयाला आपण फेटाळणार आहोत असं समजा निदर्शनास आले त्यानंतर ही चर्चा सगळी वाया जाणार आहे. सभागृहाचा वेळ जाणार आहे. त्यांचा ठराव मंजूर झाला तर त्यांना चर्चेला वेळ द्यावी काही हरकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

ठराव कोण फेटाळू शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृह.

**जुबेर इनामदार :-**

सभागृह कशा आधारावर, कुठल्या आधारावर.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब ठराव का वाचन नही किया उसके पहले फेटाल दिया। ठराव तो अभी पढा है।

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी करावी.

**नगरसचिव :-**

श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. श्री. शरद पाटील यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. शरद पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ३५, विरोधात १७ इतकी मते पडली आहेत. श्री. शरद पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११९ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेच्या वन विभागामार्फत केलेल्या ४५० झाडांचे पुनःरोपण बाबत.

**ठराव क्र. ९० :-**

सदरचा विषय फेटाळण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- राकेश शहा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | रॉड्रीक्स बाबरा रॉनल्ड | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पुजारी कांचना शेखर | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पिसाळ मनिषा नामदेव | **निरंक** |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | वंदना रामदास चक्रे | |
| १० | जैन गिता भरत | १० | काझी रशीदा जमील | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | इनामदार जुबेर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | सामंत प्रमोद जयराम | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | खण्डेलवाल सुरेश | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | अशोक तिवारी | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | म्हात्रे परशुराम पद्माकर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | सिंग मदन उदितनारायण | | | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | | | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | | | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | परमार अनिता भरत | | | |
| २८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३२ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३३ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३४ | मुन्ना सिंग | | | |
| ३५ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२०, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेच्या चिन्हाचा गैरवापर व नोंदणी बाबत.

**मा. महापौर :-**

चर्चा करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पालिकेचा जो लोगो आहे आपला. आपण ज्या सिटवरती बसलात त्या सिटवरती पण लोगो आहे तुमच्या मागे पण लोगो आहे. हा जो लोगो आहे या लोगोचा भरपूर लोक गैरप्रकार करतात, गैरवापर करतात. लोकांनी आपआपल्या गाडीमध्ये लावलेला लोकांनी आपल्या व्हिजीटींग कार्डवर छापलेले आहेत. काही लोकांनी आपल्या ऑफिसच्या बाहेर लावले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका काहींनी समाजसेवक लिहीलेले आहे अस विद्रुपीकरण झालेले आहे आणि नुकतेच काही ४-५ महिन्यांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये आले होते की सेव्हन इलेव्हन कंपनी आहेत. त्या कंपनीने हा लोगो रजिस्टर केला आहे आणि त्याच्यामध्ये असे पण नमुद केले होते की आपल्या पालिकेच्या अधिकाऱ्यांनी हा लोगो नोंदणी न केल्यामुळे त्या कंपनीचे फावले आणि त्या कंपनीने ती नोंदणी केली. तर हे आपले अधिकारी किती चुकता बघा. आज आपल्या नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले. १२-१५ वर्ष याला होऊन गेली एवढ असुन सुध्दा आपल्या पालिकेतर्फे या लोगोचे रजिस्ट्रेशन झाले नाही. ही किती चुकीची बाब आहे. आणि त्या उपर सुध्दा हे लोगो कुठल्या तरी कंपनीने रजिस्टर केले आहे. त्याच्यावरती पण ॲक्शन घेतली नाही का नाही घेतली. तर माझी आपणास अशी विनंती आहे की आयुक्तांना सांगा थोडासा खुलासा करावा. आणि सोक्षमोक्ष काहीतरी करा. ही बातमी चुकीची आहे की, खोटी आहे. काय खरयं काही नाही. आम्हाला जरा माहिती द्या ना. विषय असा आहे मॅडम बघा काही नगरसेवक आहेत त्यांनी आपआपल्या गाड्यांवर स्टिकर पण लावले नाहीत. ते आपली गाडी अशीच ड्राईव्ह करतात. आणि काही लोक नगरसेवक पण नाहीत तरी ते बिनधास्त लावतात की नगरसेवक मिरा भाईंदर महानगरपालिका, काही लोकांनी लावले समाजसेवक, काहींनी फक्त लोगो लावला आणि आपल्या महानगरपालिकेच्या आवारात सुध्दा नगरसेवकांना गाड्या उभ्या करायला जागा मिळत नाही साहेब आज महासभा आहे. भरपूर नगरसेवकांच्या गाड्या उभ्या बाहेर उभ्या आहे जागाच नाही कुठे आणि बाकीचे लोकांच्या गाड्या आतमध्ये. म्हणजे आमचे नगरसेवक बिचारे बाहेरुन चालत येतात. ही अतिशय चुकीची आणि वाईट परिस्थिती आहे. आणि मॅडम, ज्या लोकांनी याचा दुरुपयोग केला ना काही स्टिकर्स लावले विद्रुपीकरण, तर तुम्ही तुमच्या अधिकाऱ्यांना सांगा की इमिजिएटली ॲक्शन घ्या.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, बिना परवानगीने उठले त्याबद्दल सॉरी. याचा एक अर्थ असा आहे की मग अधिकाऱ्यांनी इतकी वर्ष केलं काय? १९९१-९२ ते आज महानगरपालिकेचा लोगो तुम्ही पाठीमागे लावताय. महानगरपालिकेच्या इमारतीवर लावताय, महानगरपालिकेच्या पेपर्सवर लावताय आणि तो रजिस्टर्ड होत नाही याचा अर्थ काय? त्यांनी क्लेरीफिकेशन द्यावे ना. त्यांनी सभागृहाचे समाधान करावे, नागरिकांचे पण समाधान करावे. नागरिक विचारतात तुमच्या लोगोचा काय हो विषय आहे हा सतत पेपरला येतो मला वाटते अडीच ते तीन वर्षापूर्वी महासभेत हा विषय काढला होता. आपण विरोधी पक्षनेते होते तेव्हा मीच काढलेला तो विषय त्याच्यानंतर अडीच तीन वर्षात देखील आपल्या प्रशासनाला जाग आली नाही की आपण आपल्या महानगरपालिकेचा तो एक मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे की याच्यावरही महानगरपालिका चालते ९ गावाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. ते कुठ गेल सगळ.

**शरद पाटील :-**

महापौर मॅडम, मॅडमने विषय मांडला त्याच उत्तर देतो पण त्यांनी जो आता विषय मांडला त्याच उत्तर येऊ द्या ना हा विषय वेगळा आहे आणि तो त्यांनी विषय मांडला तो वेगळा आहे. तो विषय तुम्ही आता ट्वीस्ट करु नका. त्यांच्यावर काय कारवाई करणार ते ऐकून घ्या ना.

**प्रभात पाटील :-**

ओके ठिक आहे. पण माझा विषय आहे त्याच सुध्दा प्रशासनाने उत्तर द्यायचे आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम ध्रुवकिशोर पाटील का और प्रभात ताई मॅडम का सवाल बिलकूल सही है। पर ये इतना सालोसे सत्ता में थे लोगो कब से चला आ रहा है। पहले रजिस्टर्ड करने का ध्यान नही आया। अब जो हमने कराया तब ध्यान में आया।

**भगवती शर्मा :-**

हमने कराया मतलब?

**राजेंद्र जैन :-**

जो भी कंपनी ने कराया

**सई वडके:- (विधी अधिकारी)**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो मिरा भाईदर महानगरपालिकेचा लोगो रजिस्ट्रेशन करण्यासाठी आपण मे २०१४ मध्ये कारवाई केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे उत्तर वेगळे आहे. जे अनधिकृत वापरतात त्याच्या वर काय कारवाई...........

**मा. आयुक्त :-**

काका पहिला प्रश्न त्यांचा हा होता की लोगो रजिस्ट्रेशन कधी केलाय? जे अनधिकृत वापरतात त्याच्या बद्दल मी सांगतो.

**सई वडके (विधी अधिकारी)**

आपण लोगो रजिस्ट्रेशनची कारवाई चालु केली आहे मे २०१४ मध्ये आपण अर्ज केला आहे साधारणतः या रजिस्ट्रेशनची कारवाई करण्यासाठी १९ महिने लागतात म्हणजे दोन वर्ष कम्पलीट लागतात. म्हणजे त्याला ऑब्जेक्शन असतात, सजेशन असतात कुणाला हरकती घ्यायची असतील ती सगळी प्रक्रिया कम्पलीट व्हायला एवढा साधारणतः वेळ लागतो. आपण असही केले आहे आत्ता आपण पाच अर्ज अर्जन्टली आत्ता सहा महिण्यात कारवाई व्हावी म्हणून या एक महिण्यापूर्वी आपण तो ही अर्ज दाखल केला आहे. म्हणजे सहा महिण्यात ती देखील कारवाई होऊन जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाही मॅडम विषय असा आहे काही वर्तमानपत्रात अस छापल होत की सेव्हन इलेव्हन नावाची कंपनी आहे त्यांनी हा लोगो रजिस्टर्ड केला तर याच्यामध्ये तथ्य काय?

**सई वडके (विधी अधिकारी)**

त्या संदर्भात सेव्हन इलेव्हन जी संस्था आहे त्यांनी फक्त अर्ज केलेला आहे. जानेवारी २०१४ मध्ये त्यांचाही लोगो रजिस्ट्रेशन झालेला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी सेम असाच लोगो दिला होता काय? असा सेम लोगो मिरा भाईदर महानगरपालिकेचा

**सई वडके (विधी अधिकारी)**

मिरा भाईदर महानगरपालिका नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग.

**सई वडके (विधी अधिकारी)**

त्या लोगो मध्ये जे चित्र आहे ती फक्त चित्र त्यांनी दिलेली आहे. मिरा भाईदर महानगरपालिकेचा नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सेम फॉरमॅट सेम चित्र

**सई वडके (विधी अधिकारी)**

चित्र

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अतिशय बरोबर म्हणजे दोघामधील साम्य सेम आहे.

**सई वडके (विधी अधिकारी)**

कस आहे आम्ही एकदम मन्थली comparison नाही केल पण primasesy जर बघितल असत तर साम्य दिसत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या कंपनीने अर्ज कधी केला आहे.

**सई वडके (विधी अधिकारी)**

जानेवारी २०१४ ला केलेला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आणि आपण कधी केले आहे?

**सई वडके (विधी अधिकारी)**

आपण मे २०१४ मध्ये केले आहे.

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

सर बघा साहेब विचार करा महानगरपालिका होऊन किती वर्ष झाली मग हे कामचुकार अधिका-यावरती आपण काय कारवाई करणार? आणि उदया त्या कंपनीचा अर्ज पहिला आहे आणि आपला अर्ज नंतर आहे उदया त्या कंपनीला जर हा लोगो रजिस्ट्रेशन झाला मग आपल्याला हे संपूर्ण चित्र बदलावे लागतील. साहेब मग आपण काय करणार?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर सेव्हन इलेव्हन ज्या कंपनीने अर्ज केला आहे त्यांचा फक्त अर्ज आहे लोगो त्यांच्या नावे रजिस्ट्रेशन झालेला नाही आणि आफ कोर्स मिरा भाईदर महानगरपालिका त्या अर्जाला ऑब्जेक्शन घेणार ?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब तुम्ही जर तिकडे लाईन मध्ये उभे असणार आणि मी नंतर शेवट असणार तर तुम्हाला तिकीट पहिले मिळणार नंतर मला मिळणार मॅडम त्याप्रमाणे जो पहिला अर्ज करतो त्याला ता लोगो मिळू शकतो.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो की बाजारामध्ये आपण बघतो की या मोबाईलसारखे मोबाईल भरपूर असतात सेव्हन इलेव्हन कंपनीने काय अर्ज केला याची आपण बारकाईने शहानिशा अगोदर करावी. कारण महानगरपालिकेचा लोगो सेव्हन इलेव्हन कंपनीने मागेल अस मला तरी वाटत नाही प्रथमदर्शनी परंतु काही गोष्टी त्याच्यातल्या समजा त्यांनी त्याच्यामध्ये मेन्शन केल्या असतील तर असं डबल रजिस्टर्ड कुठेही होणार नाही. आणि आपल्याला सांगितले आहे की मे २०१४ ला महानगरपालिकेने अर्ज केला आहे. त्याच्या अगोदर त्यांनी जरी अर्ज केला असला तरी महानगरपालिका ही संपूर्ण शहरासाठी आहे. सेव्हन इलेव्हन कंपनी सुध्दा पूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये किंवा राज्याच्या बाहेरसुध्दा काम करु शकते त्याच्यामुळे महानगरपालिकेने मागितलेला लोगो डबल रिप्लेकेशन होईल असं मला वाटत नाही. परंतु आपण जे म्हणतोय की, त्याच्यामध्ये थोडाफार काही साम्य असू शकते. त्यांनी मागणी केली त्याच्यामध्ये परंतु इथे आपल्याला सभागृहाच्या समोर विधी अधिकारी यांनी सांगितले की, अशा प्रकारचे रजिस्ट्रेशन आमच पण अजुन झाले नाही आणि त्यांचे पण झालेले नाही. आता ते धर्मदाय आयुक्त ठरवतील रजिस्ट्रेशन कुणाला द्यायचे कुणाला नाही. त्याची काय प्रोसीजर आहे ते पण आपल्याला सांगितले आहे. आणि दुस-या प्रश्नाचे मी उत्तर देत आहे की मी सचिवांना या पाठीमागे काय झाले त्याबद्दल मला काही ऊहापोह करायचा नाही. परंतु आपल जे महाराष्ट्र शासनाकडून गॅझेट आलेले आहे त्याच्यामध्ये संपूर्ण आपले नगरसेवक, नगरसेविकांची नावे त्याच्यामध्ये छापून आलेली आहेत हे नगरसेवक, नगरसेविका वगळता बाकीचे कुणी जर समजा बेकायदेशीर आणि सगळ्यात महत्वाचा मुद्दा आहे की आपल्या महानगरपालिकेतर्फे या गॅझेटमध्ये ज्यांची नावे ज्या पध्दतीने प्रसिध्द झालीत त्या पध्दतीने सन्मा. नगरसेवक, नगरसेविका महानगरपालिकेचा लोगो त्यांच्या स्वतःच्या एकाच गाडीवर समजा एका व्यक्तीकडे ४ गाड्या असतील तर ४ गाड्यांवर लोगो वापरता येणार नाही. फक्त त्यांनी रायटींगमध्ये लिहून द्यावे की गाडी क्रमांक अमुक मी वापरत आहे या गाडीला आपण लोगो देऊ. नाहीतर काय होतं की त्या फॅमिलीतले १० लोक १० गाड्यावर लावतात आणि त्याचा गैरवापर होतो. उद्या जर काही कमी जास्त झालं तर तुमची आणि आमची नैतिक जबाबदारी त्याच्यावर होते. म्हणून आपण सगळ्यांना अधिकृत आपल्या प्रत्येक नगरसेवकांकडून नगरसेविकांकडून पत्र घ्यावे की, या गाडी क्रमांकावर महानगरपालिकेचा लोगो वापरणार आहे. आणि त्या गाडी क्रमांकासाठी आपण द्या. त्याचे एक रजिस्टर मेन्टेन करावे. उद्याला अनावधानाने काही प्रकार घडला तर महानगरपालिकेला विचारणा झाली तर आपण अडचणीत यायला नको, संबंधित नगरसेवक, नगरसेविका पण अडचणीत यायला नको. मी सभागृहाला आणि सन्मा. नगरसेवक आणि नगरसेविकांना विनंती करतो की

आपण सुध्दा काही थोड नियमांचे काटेकोरपणे पालन करावे की आता सर आपणच म्हणतात की सन्मा. माजी नगरसेवक आहेत ते पण लावतात. म्हणजे माजी नगरसेवक जे या सभागृहात होऊन गेले त्यांनी सुध्दा हे तारतम्य ठेवावे की समजा या ठिकाणाहून मी आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालो किंवा माझी बदली झाली तर परत मी मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त लावणे म्हणजे आपल्या प्रेसटिजलाच प्रश्न विचारला पाहिजे. त्याच्यामुळे असे होणार नाही याची आपण सर्वांनी दखल घ्यावी आणि आपण अधिकृत जे नगरसेवक, नगरसेविका आहेत ज्यांचे कोर्ट मॅटर आहेत किंवा ज्यांना हे केलेले आहे ते वगळून बाकी सर्व तपासून घ्यावे आणि त्यांना द्यावे आणि त्यांच्याकडून गाडी नंबरचे एक पत्र घेऊन देऊन टाकावे. आणि त्याच्या व्यतिरिक्त जर वापरत असेल किंवा माजी नगरसेवक जे वापरतात तर पोलिसांना पत्र द्या की हे आमचे अधिकृत नगरसेवक, नगरसेविकांना लोगो दिलेला आहे याचा गाडी क्रमांक यांना दिलेले आहे अस पोलिसांना पत्र द्या. त्याच्या व्यतिरिक्त आढळून आले तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करा अस त्यांना कळवावे.

**अनिल भोसले :-**

कमिशनर साहेब आता जो आपला लोगो आहे. आपलं रजिस्ट्रेशनच नाही तर नगरसेवक कसे लावू शकतील. लोगोच रजिस्टर नाही तर कुठल्या अधिकाराने आपण नगरसेवकांचे पत्र मागतात आणि कुठल्या अधिकाराने आम्ही लोगो लावू शकतो. कारण मिरा भाईंदर महानगरपालिकेने २०१४ मध्ये नगरसेवकांनी एका व्यक्तीने माझ्या विरोधात नगरसेवकाने लावलेला लोगो हा अनलिगल आहे म्हणून पोलिस स्टेशनला तक्रार केली होती. त्यामध्ये हरिभाऊंनी मला पोलिस स्टेशनला एक पत्र पाठविले आहे. नगरसेवकांनी या गाडीची कुठलीही परवानगी मागितली नाही. त्याच्यावर कायदेशीर कारवाईस पात्र आहे अस हरिभाऊंचे पत्र आहे. लोगोच तुमचा नाही तर या विषयावर तुम्ही पत्रव्यवहार कुठल्या आधारावर करु शकता.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. अनिल भोसले साहेबांनी चांगला प्रश्न मांडला आणि ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी चांगला विषय निदर्शनास आणला. आयुक्त साहेबांनी जे आपल्याला विधी मॅडमने माहिती दिली हा विषय झाला होता महानगरपालिकेमध्ये साधारण मे २०१३ ज्यावेळी प्रभातताई आपण बोलल्या माजी महापौर कॅटलीन परेरा होत्या, आणि त्यावेळी खरोखर हास्यबाब होती की ज्या लोगो मा. महापौर मॅडमच्या चेअरवर आहे ज्या लोगोच्या आधारे आपण सर्व पत्रव्यवहार कागदपत्र लिगल सगळ आपण जे काही करतो तो मुळ आपले रजिस्ट्रेशनच नाही. सेव्हन इलेव्हन कंपनीकडून त्यावेळी ती माहिती घेतलेली आहे. त्यांनी फक्त हे प्रशासनाला दाखवायला की तुम्ही वारंवार सभागृहात चर्चा होऊन २० वर्षापासून जे वापरतात तुम्ही ते रजिस्ट्रेशन सुध्दा करु शकले नाहीत आणि त्या कंपनीने एका महिन्यामध्ये, मॅडमने तुम्हाला जी माहिती दिली ती चुकीची माहिती दिली. त्या लोगोचे पैसे भरले म्हणजे प्रायमाफेसीची एखादा आपण सोसायटी रजिस्ट्रेशन पाच नावे द्यावे लागतात त्यामध्ये त्यांच्याकडे जे वेकेंट असतो तो एक नाव तुम्हाला दिला जाते. त्यावेळी जेव्हा लोगो दिले गेले ते अप्रुव्हड केले त्याचे पैसे भरुन घेतले त्याची रिसिप्ट घेतली आता बाकीची प्रोसेस जी असेल ती असेल. १९ महिने मला वाटत नाही लागत असेल आणि १९ महिने जाऊ द्या ना. मे २०१४ आज काय आहे. साधारण एखादा महिना कमी असेल म्हणजे पुढच्या महिन्यात येणार तुमच अस म्हणण आहे. तुमची प्रोसेसच झाली नाही त्या कंपनी तुम्हाला नाहरकत नक्की देतील या शहराच्या हितासाठी या शहराच्या सन्मानासाठी मी द्यायला लावेल त्यांना विनंती करुन की, आपल्याला ते ना हरकत द्यावे. त्यामध्ये आयुक्त महोदय, मा. महापौर मॅडम असच होत की प्रशासन कुठल्याही विषयाच्या बाबतीत गंभीर नाही काळजी घेत नाही. आपल्या माहितीसाठी सांगतो महापौर निधी हे गोळा करण्यासाठी आपल्याला धर्मदाय आयुक्तांकडे ती रजिस्ट्रेशन आता मला सांगा इथे सर्व आहेत, संस्था किती दिवसात रजिस्टर होतात. १ महिना, २ महिना, ३ महिने महापौर निधीचे म्हणजे संस्थेचे नाव काय दिले आपण, चॅरिटेबल ॲक्ट खाली ती संस्था रजिस्टर करतो. महापौर त्याचे अध्यक्ष असतात त्या संस्थेचे आपण नाव काय देतो. आता कुठलीही संस्था तुम्ही आज सांगा २ महिने लागतात. गेल्या १० महिन्यांपासून तुम्ही वारंवार मी महापौर होतो त्यावेळेपासून अर्ज करायला सांगितले आजपर्यंत झाले नाही. २ महिन्याचे काम हे तुम्ही२-२, ४-४ वर्ष करत नाही. म्हणजे प्रशासनाला कुठेही काही इंट्रेस्ट नाही. आता अनिलजीने विचारले, त्यांच्यासारखे माझ्यासारखे असेल तर तुम्हाला पहिले सांगेल की तुम्ही लावलेत ते पहिले काम तुमच्यावर गुन्हा दाखल करु. त्यांच्या आणि माझ्यासारखे असेल तर तुम्हाला आधी पत्र देतील. पोलिस स्टेशनला देतील की हे सगळ काढायला लावाल आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल करा अस होत नाही. आयुक्त साहेब या महानगरपालिका बद्दल सर्व सदस्यांना सन्मान आहे. या शहराच्या नागरिकांना सन्मान आहे कुठेही हा लिगलिटीमध्ये जाऊ नये. टेक्नीकलीमध्ये जाऊ नये म्हणून आपल्याला विनंती आहे त्या कंपनीचा आपण ना हरकत मागवावे आणि त्वरीत हा लोगो रजिस्ट्रेशन करण्यासाठी आपण पाठपुरावा करा आणि फक्त पोलिस स्टेशनला पत्र नाही त्यामध्ये आपल्या महानगरपालिकेचे एक धोरण ठरवा की एखाद्याने त्याचे गैरवापर केले तर काय दंडात्मक महानगरपालिकेतर्फे कारण नुकसान आमचं केले. पोलिसात गैरवापर केला याचीच एखादा गुन्हा दाखल करेल पण नुकसान महानगरपालिकेचे केले त्या लोगोच्या माध्यमातून मग आपला पण दंड त्याच्यावर लागायला पाहिजे. मग तो रकमेच असू द्या, गाडी जप्तीचे असू द्या काहीही असू द्या. याप्रमाणे आपण रितसर विषय आणा. कुठेतरी चांगल मेसेज आता नगरसेवकांचा लोगो असा झाला आहे कुणीही लावा, कुठेही लावा अनेकदा आम्हाला वाटत हा कुठला नगरसेवक बाजुला गाडी येऊन उभी राहते आम्ही गाडीत अस बघतो हा कोणता नगरसेवक कुणी दिसतच नाही. अशाप्रकारे लोगोचे गैरवापर आणि हे फक्त काय कोणी टोल वापरासाठी

कोणी पोलिसांसाठी आपण त्वरीत एक पेपरला जाहिरात पण द्यावी त्यावर मी तर बोलेल महापौर मॅडम त्यांची गाडी जप्त करावी. कमीत कमी ५०००० त्यांच्याकडून दंड घ्यावा. दुसरे गाडी जप्त करावी. अशाप्रकारे ज्या आपल्या अधिकाऱ्यांच्या निर्देशात येतील त्यांनी जाऊन तो गुन्हा दाखल पोलिस स्टेशनला करावे. पोलिस स्वतःहून करणार नाही दाखल. आपल्या निदर्शनास तिकडेच आपल्याला माहितीमध्ये हा गाडी नंबर नाही. तुम्ही गाडी नंबर पोलिस स्टेशनला पाठवा ते आर.टी.ओ. मधून माहिती घेतील त्याच्यावर गुन्हा दाखल तर याच्यावर कुठेतरी अंकुश येणार आणि परत सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो लोगो रजिस्ट्रेशन, महापौर निधी चॅरिटेबल ॲक्ट खाली या दोन्ही संस्था आपल्या इमिजिएटली रजिस्ट्रेशन कराव्या. भविष्यात अशा कुठल्याही प्रकारची घटना परत घडू नये.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, एक इसीसे संबंधित की यह तो इन्होंने खुले मनसे बोल दिया की सेव्हन इलेव्हन कंपनी ऑब्जेक्शन, नो ऑब्जेक्शन देगी करेगी हो जाएगा। लेकिन मैं विधी विभाग को एक चीज और ध्यान दिलाना चाहता हूँ की, सेम लोगो अभी ध्रुवकिशोर भाई ने बोला था की, सेम लोगो के अंदर में मनपा लिखा हुआ है। वहाँ पे समाजसेवक करके उसको यूज कर रहे है। तो ऐसा कायदे के अंदर में क्या तरतूद है उसके हिसाब से उनके उपर कारवाई कर सकते है। क्योंकी उनको कहते है तो वो कहते है की मिरा भाईंदर महानगरपालिका लिखा नही है। हमने समाजसेवक लिखा है। कोई कुछ लिखता है अपनी कंपनी का नाम लिखता है तो ऐसी स्थिती के अंदर में कानुनन क्या प्रोव्हिजन है की, उनके उपर में भी हम कारवाई कर सकते है नही तो क्या होगा की, वो पॅरलल एक चिन्ह उसके अंदर में चलेगा तो उसके उपर में भी विशेष ध्यान दिया जाए। दुसरा इसी तरीके का मैं आपको ध्यान दिलाना चाहता हूँ, महापौर मॅडम, आयुक्त साहब ऐसा एक गर्व्हमेंट का जी.आर. आया हुआ है की आयुक्त साहब जो .डी वर्ग की महानगरपालिका है वो आपकी जो गाडी है उसके उपर पीली बत्ती नही लगा सकते है। महापौर लालबत्ती नही लगा सकते ऐसे मुंबई महानगरपालिका तो इसका भी ऐसे लग रहा है की वो कानुनन जो जी.आर आया है उसका कही ना कही उल्लंघन हा रहा है। तो उसको भी रोका जाए जैसे यह गैरचिन्ह का वापर हो रहा है। वैसे इसको भी अगर गैरवापर हो रहा है तो उसका भी रोकथाम के लिए उपाययोजना कि जाए।

**नरेंद्र मेहता :-**

या विषयावर मला जास्त माहित नाही पण मला माहित आहे की या पूर्वीचे माजी महापौर मॅडमने चांगला अभ्यास केला होता आणि ते बत्ती वापरु शकतो. ते पहिलेही चालु होते आणि आत्ताही चालु आहे अस माझं तरी मत आहे की अभ्यास ऑलरेडी राष्ट्रवादीच्या वतीने केलेला आहे यावर आणि अनेकदा आम्ही हा विषय मांडला होता.

**भगवती शर्मा :-**

नही नही साहब जी.आर है।

**नरेंद्र मेहता :-**

जी.आर जे बोलता ते माझ्या माहितीप्रमाणे २०१२-१३ चा जी.आर. आहे. त्यानंतर अनेकदा आम्ही विषय मांडला लेखी तक्रार सुध्दा आपल्याकडे केलेली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, आपण हे निर्देश द्यावे स्पष्ट की ही जी चर्चा चालली आहे सगळी ......... आहे. त्यात चुकीचे काही नाही आणि कितीही केले तरी त्याचा शेवट होणार नाही. जर एखाद्यावर आयुक्त साहेब कारवाई करायला घेतली तर ती टिकणार नाही. आणखी चेष्टेचा विषय होईल आमची विनंती ही राहील की ही प्रोसेस जी आहे ती फास्ट करणे हे त्यातील सोल्युशन आहे आणि ज्या दिवशी होईल त्या दिवशी ही जी मोघम चर्चा झाली त्याचा ठराव करुन त्याला मान्यता देणे हे सोयीचे आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत निविदा कामांवर दृष्टीक्षेप टाकण्यासाठी किंवा ती-ती काम वेळेवर होण्यासाठी असे विभाग निर्मिती केली आहे त्याप्रमाणे विधी विभाग आहे. आत्ताच सन्मा. मेहता साहेबांनी जे सांगितले लोगाचे रजिस्ट्रेशन विषयी २०१४ पासुन आतापर्यंत अशा महत्वाच्या गोष्टीवर जसा लोगोचा विषय आहे. तशाच बऱ्याच गोष्टी आहेत. महानगरपालिकेच्या अंतर्गत कायदे आणि सुरक्षा किंवा इतर काही गोष्टी आहेत त्याच्यावर देखील विधी विभागाकडून दिरंगाई केली जाते त्यामुळे त्या विभागामार्फत प्रत्येक गोष्टीचे निरसन होण्यासाठी ताबडतोब त्याच्यावर कारवाई करण्यासाठी आपण तसे आदेश देण्यात यावे अशी मी आपणाला विनंती करते.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम मैं आपको पुरे मिरा भाईंदर और महासभा की तरफ से आपको धन्यवाद देना चाहता हूँ की आपके आने के बाद में कम से कम यह रजिस्ट्रेशन का प्रोसिजर चालु हुआ नही तो हमको लगता था की अगर आप जैसे महापौर नही आते तो यह ...............

**वर्षा भानुशाली :-**

महापौर मॅडम, आपकी परवानगीसे बोलना चाहती हूँ अभी जो आयुक्त साहबने रुलींग दिया बहुत अच्छा लगा। लोगो रजिस्ट्रेशन नही था पर उन्होंने स्ट्रिक्टली रुलींग दिया मुझे लगता है हर महासभा में

रुलिंग महापौर देती है या तो फिर आयुक्त साहब देते है लेकिन उसके उपर पालन कितना होता है। सिर्फ यहाँ पे एक रुलिंग देते हो, स्ट्रीक्टली बोलते हो पर उसका कुछ पालन नही होता। आप रुलिंग देते हो या तो ऑन पेपर दो या सिर्फ बोलने के लिए मत दो।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तत्कालीन नगरपरिषदेने सुमारे १९९७ साली मिरा-भाईंदर शहराची भौगोलीक परिस्थीती, इतिहास, शहरीकरण याचा सखोल विचार करून त्यात आरोग्य सेवा, शिक्षण, शेतकरी, शिलोत्री, डोंगराळ भाग, सागरी किनारा आदिंचा समावेश करुन चिन्ह (लोगो) बनविले होते व त्यानंतर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्याने तोच लोगो वापरात आणला पण प्रशासनाने चिन्ह नोंदणी करण्याची प्रक्रीया किंवा प्रयत्नही केलेला नाही. केवळ औपचारीकता पार पाडली व त्याचा अनेक लोकांनी गैरफायदा घेऊन चिन्ह आपल्या खाजगी वाहनावर लावून फिरतात कांहीनी त्याचे विद्रुपीकरण केले व स्टीकर वाहनावर लावले.

मा. आयुक्तांनी मनपाचा लोगो नोंदणी करण्याकरीता मा. उपायुक्त पदावरील अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावी व जी व्यक्ति महापालीकेच्या चिन्हांचा गैर वापर करत असेल त्यांचावर पोलिस (वाहतूक शाखा) येथे फौजदारी गुन्हा दाखल करावा असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १२० :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेच्या चिन्हाचा गैरवापर व नोंदणी बाबत.

**ठराव क्र. ९१ :-**

तत्कालीन नगरपरिषदेने सुमारे १९९७ साली मिरा-भाईंदर शहराची भौगोलीक परिस्थीती, इतिहास, शहरीकरण याचा सखोल विचार करून त्यात आरोग्य सेवा, शिक्षण, शेतकरी, शिलोत्री, डोंगराळ भाग, सागरी किनारा आदिंचा समावेश करुन चिन्ह (लोगो) बनविले होते व त्यानंतर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्याने तोच लोगो वापरात आणला पण प्रशासनाने चिन्ह नोंदणी करण्याची प्रक्रीया किंवा प्रयत्नही केलेला नाही. केवळ औपचारीकता पार पाडली व त्याचा अनेक लोकांनी गैरफायदा घेऊन चिन्ह आपल्या खाजगी वाहनावर लावून फिरतात कांहीनी त्याचे विद्रुपीकरण केले व स्टीकर वाहनावर लावले.

मा. आयुक्तांनी मनपाचा लोगो नोंदणी करण्याकरीता मा. उपायुक्त पदावरील अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावी व जी व्यक्ति महापालीकेच्या चिन्हांचा गैर वापर करत असेल त्यांचावर पोलिस (वाहतूक शाखा) येथे फौजदारी गुन्हा दाखल करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्रीम. वंदना चक्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२१, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अनधिकृत फेरीवाल्यांवर कार्यवाही करणे बाबत.

**सुनिला शर्मा :-**

प्रकरण क्र. १२१ च्या ठरावाचे वाचन केले.

**सुमन कोठारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे महापौर मॅडम सत्ताधारी पक्षाचा असा विषय आहे की, अनधिकृत फेरिवाले शहरात बसावे. ट्रॅफिकची कोंडी व्हावी लोकांना त्रास व्हावा, पादचा-यांना त्रास व्हावा असे सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे असं मला वाटते. प्रशांतजी आपण ज्या पोटतिडकीने बोलतात. त्यांना देखील फेरिवाल्यावर कारवाई झाली पाहिजे.

**शरद पाटील :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने हा रितसर विषय विषयपटलावर घेऊन यावे अशी आम्ही सूचना मांडत आहोत.

**प्रशांत केळुसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम जरी हा विषय आपण फेटाळत असाल तरी मी आपणास लक्षवेधी दिलेली आहे ती कृपा करुन घेण्याची विनंती करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बघा इथे लक्षवेधी पण आलेली आहे आणि शरद पाटील साहेब बोलतात की विषय पुन्हा घेण्यात यावा. पाटील साहेब माझं अस म्हणणे आहे की जर हा विषय आला आहे तर चर्चा झाली पाहिजे ना. महापौर मॅडम, संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये अनधिकृत फेरिवाल्यांचे त्रास वाढलेला आहे. भाईंदर वेस्ट बघा, भाईंदर ईस्ट बघा, मिरारोड, रेल्वे स्टेशन बाहेरचा रस्ता बघा त्या संपूर्ण रस्त्यावरती फेरिवाला.

**मा. महापौर :-**

यासाठी अस आहे की जोपर्यंत फेरिवाला समिती आपल्याकडे गठित होत नाही तोपर्यंत आपण काही निर्णय घेऊ शकत नाही. तुमचा हा जो प्रस्ताव आहे मला वाटते थोडे अप्रासंगिक आहे. समिती होऊ द्या मग आपण त्या विषयावर बोललो तर बर होणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम एक प्रश्न फक्त करतो की अनधिकृत फेरिवाल्यांवर कारवाई होत नाही परंतु काही ठराविक वॉर्डमध्ये कारवाई होते मग ती कारवाई तुम्ही थांबवणार का? सांगा.

**मा. महापौर :-**

अनधिकृत फेरिवाला तुम्ही कुणाला सांगता म्हणजे फेरिवाला क्षेत्रामध्ये बसलेले आपण कारवाई करत नाही. ना फेरिवाला क्षेत्रात जर बसले तर.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ना फेरिवाला क्षेत्र मी तेच म्हटले आहे. अनधिकृत म्हणजे की जो ना फेरिवाला क्षेत्रामध्ये बसतो तो अनधिकृत म्हणजे जो फेरिवाला क्षेत्रामध्ये बसतो आम्ही फेरिवाला क्षेत्राबद्दल बोलतच नाही. आम्ही अनधिकृत फेरिवालाबद्दल बोलतोय. तुम्ही एकीकडे अस म्हणता की महानगरपालिका कारवाई करु शकत नाही. परंतु महानगरपालिकेचे अतिक्रमणचे पथक, फेरिवाला निर्मुलनचे पथक फिरते आणि कारवाई करते मग ते का कारवाई करता सांगा मला. मग त्यांनी पण ती कारवाई स्टॉप करावी ना.

**मा. महापौर :-**

मी तुम्हाला वारंवार तेच सांगते की ना फेरिवाला क्षेत्रात आपण कारवाई आता करु शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझ्या म्हणण्याचा उद्देश तोच आहे की तुम्ही हा प्रस्ताव नीट वाचला नाही मी अनधिकृत फेरिवाला म्हटले आहे अनधिकृतचा अर्थ असा होतो की जे ना फेरिवाला क्षेत्रामध्ये धंदा करतात ते अनधिकृत झाले तोच विषय मॅडम मी आणलेला आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आपण ठराव मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपरोक्त विष्यांबाबत मा. स्थायी समिती, मा. प्रभाग समितीच्या बैठकीत तसेच मा. महासभेत सन्मा. सदस्यांनी चर्चा घडवून आणली व अनाधिकृत फेरीवाल्यांवर कायदेशीर कार्यवाही करणे बाबत प्रशासनाला सुचीत केले पण अद्याप प्रशासनाकडुन कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही व फेरीवाले बिनधास्तपणे धंदा करतात.

अनाधिकृत फेरीवाल्यांना हटवण्या करीता अनेक वेळा सन्मा. सदस्यांचे, पालिका कर्मचा-यांचे व फेरीवाल्यांच्या मध्ये भांडण झाले आहे. या बाबत तक्रारी पोलिस ठाण्यामध्ये नोंद आहे. फेरीवल्यांच्या गुंडांकडुन सन्मा. सदस्यांना जिवे ठार मारण्याचा धमक्या मिळाल्या या बाबत, पालिका कर्मचारी व अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल होऊन आरोप- प्रत्यारोप झाले आहे. शहराच्या प्रथम नागरीक मा. महापौर, मा. आमदार, मा. उपमहापौर यांना फेरीवाले हटवीण्याकरीता आंदोलन करावे लागले तातपूर्ती कार्यवाही संबंधीत प्रभागा मध्ये झाली असून संपूर्ण शहरामध्ये कोण्तेहि कार्यवाही झालेली नाही. नुकतेच भाईंदर (प.) येथील जनता नगर येथील रस्त्यावर अनाधिकृतपणे बसणा-या फेरीवाल्यांच्यावर कार्यवाही करते वेळी मनपा कर्मचारी, फेरीवाले व सन्मा. सदस्य यांच्यात वाद झाला व या बाबत पोलिस ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल झालेला आहे.

दररोज संध्याकाळी "मेरी मेन्शन बिल्डींग ते नागेश्वर बिल्डींग पर्यंत" व "बद्रीनाथ बिल्डींग ते देवछाया बिल्डींग ६० फूट रोड पर्यंत" गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात नवीन फेरीवाले बसत आहेत. भाईंदर पश्चिमेस रहदारी करीता छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (स्टेशन रोड) व डॉ. बाबासाहेब आंबेड्कर मार्ग (६० फूटी रोड) दोनच रस्ते प्रमुख असल्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी व अडथळा होऊन बिकट परिस्थीती झाली आहे. या बाबत मा. प्रभाग अधिकारी, मा. विभाग प्रमुख, अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम नियंत्रण कक्ष यांच्याकडे अनेक वेळा तक्रारी करून देखील कोणतीही कार्यवाही प्रशासनाद्वारे झालेली नाही. मिरारोड पूर्व व भाईंदर (प.) येथे फेरीवाल्यांचा बाबत झालेली घटना पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेड्कर मार्ग (६० फूटी रोड) येथे होण्याची शक्यता नाकारता येत नाहीत तसेच असे घटना घड्ल्यास प्रशासन पूर्ण जबाबदार राहील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ०४/०९/२०१५ रोजीच्या मा. महासभेत उपरोक्त विषयाबाबत "ज" अन्वये प्रस्ताव आणला होता त्यावेळी सदरचा विषय पुढील मा. महासभेत रितसरपणे घेण्यात येईल असे ठराव सर्वानुमते मंजूर झाला होता परंतु आजनितीस दि. ०४/१२/२०१५ च्या मा. महासभेत उपरोक्त विषय प्रशासनाकडून आलेला नाही. मिरा-भाईंदर शहरातील अनाधिकृत फेरीवाल-यांवर कडक कार्यवाही करावी व प्रभाग अधिका-यांच्या वर जबाबदारी निश्चित करावी व त्यांनी कार्यवाही न केल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम, १९४९ चे कलम ५६ अनव्ये कर्तव्यात हयगय, निषकाळजीपणा बद्दल कायदेशीर कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो या विषयाला धरुन विषय आहे. आयुक्त महोदय आपण पण ऐका आपल्या केंद्र शासनाकडून फेरिवाला समिती गठित झालेली आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला फेरिवाला समिती नविन गठित करायचे आदेश आले आहेत त्यानुसार आपण ते करु.

**वंदना चक्रे :-**

नविन का जुने का नाही आधी झालेले आहे आयुक्त महोदय आपण उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

बसुन जा मी आपल्याला सांगते. आता नविन जे आदेश आलेत त्याप्रमाणे आपण समिती...........

**वंदना चक्रे :-**

जुन्या आदेशचे काय झाले आयुक्त साहेबत उत्तर द्या.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, चक्रे मॅडम आपल्या प्रश्नाचे उत्तर देत आहे. आपली फेरिवाला समिती गठित झाल्यानंतर शासनाने नविन एक धोरण स्विकारलेले आहे आणि नविन जी.आर निघाला त्यानुसार आपली समिती गठित होणार आहे. तर आपली जी समिती गठित झाली होती ती जुन्या जी.आर प्रमाणे झाली होती. पण आता एक नविन सुधारित जी.आर निघाला आहे. त्याप्रमाणे समिती गठित केल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

**वंदना चक्रे :-**

आयुक्त महोदय आपण म्हणता जुना जी.आर. आणि नविन जी.आर.

**मा. आयुक्त :-**

मॅडम जरा ऐका, माझ्या बोलण्याकडे लक्ष द्या तर तुमच्या प्रश्नाचं उत्तर मिळेल. आपली समिती गठित झाल्यानंतर म्हणजे बैठक बोलण्यापूर्वीच शासनाचा नविन जी.आर. आला की जुन्या जी.आर. प्रमाणे आपली समिती गठित केली होती आता नविन जी.आर प्रमाणे समिती गठित झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. जुना जी.आर. रद्द करण्यात आला आहे नविन जी.आर. प्रमाणे कारवाई होईल.

**वंदना चक्रे :-**

आयुक्त साहेब माझा असा प्रश्न आहे की, हे संपूर्ण भारतामध्ये झाले आहे का फक्त मिरा भाईंदर पूरती झाली. याच उत्तर द्यावे मला.

**मा. आयुक्त :-**

संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये तो जी.आर लागू झाला.

**वंदना चक्रे :-**

फक्त महाराष्ट्र राज्यामध्ये नाही तर पूर्ण भारतामध्ये लागू आहे का फक्त मिरा भाईंदरमध्ये महाराष्ट्र शासनापुरते बोलत नाही मी. त्याची आम्ही पण माहिती काढणार आहोत. मनमानी कारभार करुन चालणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**वंदना चक्रे :-**

आयुक्त महोदय संपूर्ण महाराष्ट्रामध्ये झाले आहे का?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही ऐकले नाही मी ४ वेळा सांगितले पूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये लागू झाले आहे.

**वंदना चक्रे :-**

त्याची कॉपी आम्हाला द्यावी.

**प्रकरण क्र. १२१ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अनधिकृत फेरीवाल्यांवर कार्यवाही करणे बाबत.

**ठराव क्र. ९२ :-**

उपरोक्त विष्यांबाबत मा. स्थायी समिती, मा. प्रभाग समितीच्या बैठकीत तसेच मा. महासभेत सन्मा. सदस्यांनी चर्चा घडवून आणली व अनाधिकृत फेरीवाल्यांवर कायदेशीर कार्यवाही करणे बाबत प्रशासनाला

सुचीत केले पण अद्याप प्रशासनाकडुन कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही व फेरीवाले बिनधास्तपणे धंदा करतात.

अनाधिकृत फेरीवाल्यांना हटवण्या करीता अनेक वेळा सन्मा. सदस्यांचे, पालिका कर्मचा-यांचे व फेरीवाल्यांच्या मध्ये भांडण झाले आहे. या बाबत तक्रारी पोलिस ठाण्यामध्ये नोंद आहे. फेरीवल्यांच्या गुंडांकडुन सन्मा. सदस्यांना जिवे ठार मारण्याचा धमक्या मिळाल्या या बाबत, पालिका कर्मचारी व अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल होऊन आरोप- प्रत्यारोप झाले आहे. शहराच्या प्रथम नागरीक मा. महापौर, मा. आमदार, मा. उपमहापौर यांना फेरीवाले हटवीण्याकरीता आंदोलन करावे लागले तातपूर्ती कार्यवाही संबंधीत प्रभागा मध्ये झाली असून संपूर्ण शहरामध्ये कोण्तेहि कार्यवाही झालेली नाही. नुकतेच भाईंदर (प.) येथील जनता नगर येथील रस्त्यावर अनाधिकृतपणे बसणा-या फेरीवाल्यांच्यावर कार्यवाही करते वेळी मनपा कर्मचारी, फेरीवाले व सन्मा. सदस्य यांच्यात वाद झाला व या बाबत पोलिस ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल झालेला आहे.

दररोज संध्याकाळी ''मेरी मेन्शन बिल्डींग ते नागेश्वर बिल्डींग पर्यंत'' व ''बद्रीनाथ बिल्डींग ते देवछाया बिल्डींग ६० फूट रोड पर्यंत'' गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात नवीन फेरीवाले बसत आहेत. भाईंदर पश्चिमेस रहदारी करीता छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (स्टेशन रोड) व डॉ. बाबासाहेब आंबेड्कर मार्ग (६० फूटी रोड) दोनच रस्ते प्रमुख असल्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी व अडथळा होऊन बिकट परिस्थीती झाली आहे. या बाबत मा. प्रभाग अधिकारी, मा. विभाग प्रमुख, अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम नियंत्रण कक्ष यांच्याकडे अनेक वेळा तक्रारी करून देखील कोणतीही कार्यवाही प्रशासनाद्वारे झालेली नाही. मिरारोड पूर्व व भाईंदर (प.) येथे फेरीवाल्यांचा बाबत झालेली घटना पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेड्कर मार्ग (६० फूटी रोड) येथे होण्याची शक्यता नाकारता येत नाहीत तसेच असे घटना घड्ल्यास प्रशासन पूर्ण जबाबदार राहील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ०४/०९/२०१५ रोजीच्या मा. महासभेत उपरोक्त विषयाबाबत ''ज'' अन्वये प्रस्ताव आणला होता त्यावेळी सदरचा विषय पुढील मा. महासभेत रितसरपणे घेण्यात येईल असे ठराव सर्वानुमते मंजूर झाला होता परंतु आजनितीस दि. ०४/१२/२०१५ च्या मा. महासभेत उपरोक्त विषय प्रशासनाकडून आलेला नाही. मिरा-भाईंदर शहरातील अनाधिकृत फेरीवाल-यांवर कडक कार्यवाही करावी व प्रभाग अधिका-यांच्या वर जबाबदारी निश्चित करावी व त्यांनी कार्यवाही न केल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम, १९४९ चे कलम ५६ अनव्ये कर्तव्यात हयगय, निषकाळजीपणा बद्दल कायदेशीर कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२२, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शहरात मच्छरांचा हैदोस, डेंग्यु व मलेरीयाचा शहराला विळखा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा - भाईंदर शहरात गेले अनेक दिवसांपासून मच्छरांचे प्रमाण खुपच वाढले आहे. पालिके तर्फे मच्छरांवर नियंत्रण करण्याकरीता औषध फवारणी केली जाते परंतु ती फक्त नावाला, दाखवण्या करीता औषध फवारणीचा काहीही उपयोग होत नाही. मच्छरांचे प्रमाण वाढतच आहे. पालिकेचे लाख़ो रुपये गटाराच्या पाण्यात वाया जात आहे.

तसेच शहरात अनेक डेंग्यु व मलेरीयाचे रुग्ण आहेत परंतु पालीकेकडे रुग्ण शोधून आजूबाजूला औषध फवारणी करण्याकरीता रुग्ण शोधण्याची कोणतीही यंत्रणा नाही. डॉक्टर व हॉस्पीटल पालिकेला कळवत ही नाही तसेच पालीकेचे डॉक्टर डेंग्यु चे रुग्ण शोधुन उपाययोजना करण्याकरीता काहीही कार्यवाही करत नाही. सुमारे ४० Multi Purpose Worker मनपाने या मोहीमेसाठी व इतर कामासाठी घेतले होते. सुरुवातीला त्यांनी काम केले दोन वर्षापासून त्यांना दुसरे काम दिले जात असल्यामुळे या कामावर दुर्लक्ष झाले आहे. महापालिकेने मच्छरांनवर औषध फवारणी करणा-या कर्मचा-यांना व सुपरवाईसरला प्रशिक्षण दयावे तसेच धुर फवारणी (Fogging) पुन्हा सुरु करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आता मला चर्चा करु द्या मी तुम्हाला सांगतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मा. ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे गेल्यावर्षी पेक्षा या वर्षी मलेरिया आणि डेंग्युचे प्रमाण फार कमी झालेले आहे. आकडेवारी पण जमा केलेली आहे. आपण खाजगी हॉस्पीटलमधून, सरकारी हॉस्पीटलमधून ते तुम्हाला वाचून दाखवतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब एक मिनिट तुमच्या चेंबरला तुम्ही मिटींग बोलवा एम.बी.बी.एस. डॉक्टर.

**मा. आयुक्त :-**

जो रेकॉर्ड आहे आपलं महानगरपालिकेचे आपण तपासून बघा. ते चुकीची माहिती देणार नाही आणि आपल्याला खाजगी दवाखान्यातून आलेली माहिती आणि सरकारी दवाखान्यातून आलेली माहिती देत आहेत ते. आपल्या प्रश्नाचे उत्तर देत आहेत ऐकून घ्या शांत चित्तेने.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

गेल्यावर्षी जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१४ मध्ये मलेरियाचे पेशंट २२६ होते तर या वर्षी फक्त १०९ आहेत. गेल्यावर्षी डेंग्युचे २५ पेशंट होते या वर्षी फक्त ५ आहेत.

**मा. आयुक्त :-**

गेल्या वर्षीच्या कम्पॅरिजनमध्ये यावर्षात सुधारणा आहे हे यातून दिसून येते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सर तुमचे अभिनंदन परंतु माझ्या माहितीप्रमाणे तुम्हाला सांगतो की शहरातले प्रत्येक हॉस्पीटल, शहरातले डॉक्टर जे मलेरिया आणि डेंग्युचे पेशंट येतात ते तुम्हाला कळवत नाहीत. ते अजिबात तसदी घेत नाहीत साहेब हे फॅक्ट आहे. पाहिजे असेल तर साहेब ज्याप्रमाणे तुम्ही जर बघितले असेल की राजा आपल्या प्रजामध्ये वेश बदलून जातो त्याप्रमाणे आयुक्त साहेब तुम्ही वेश बदलून जा. आणि डॉक्टरांना विचारा. तुम्ही आयुक्त म्हणून तुमची ओळख देऊ नका डॉक्टरकडे जा आणि त्यांना विचारा साहेब डेंग्युचे, मलेरियाच्या पेशंटबद्दल काय तुमची माहिती आहे. काय स्थिती आहे. तुम्ही कळविता का नाही त्याबाबत. साहेब तुम्ही नॉर्मल माणूस म्हणून जा. ॲज अ पेशंट म्हणून जा साहेब तुम्हाला खरी हकीकत मिळेल. साहेब आम्ही नगरसेवक वॉर्डमध्ये फिरतो आम्ही लोकांना भेटतो. लोकांमध्ये मिसळतो लोकांच्या ज्या डिफिकल्टीज आहे त्या प्रॅक्टीकली बघून घेतो. साहेब आपल्या अधिकाऱ्यांना तुम्ही खाली पाठवा तुम्ही त्यांना शहरात फिरायला सांगा रात्री ९ वाजता महापौरांच्या वॉर्डात मी तुम्हाला घेऊन जातो. साहेब तुमच्या डोक्यावर असे मच्छर फिरतील साहेब तुम्ही पाच मिनिट उभे राहू शकरणार नाही अशी परिस्थिती आहे आणि फॅक्ट आहे. साहेब हे चूकीचे नाही. तुमची भावना चांगली आहे परंतु त्याचा स्टाफ आहे ना टेम्परररी आणि कॉन्ट्रॅक्टचा आहे. साहेब तो ट्रेन्ड नाही त्याला माहित नाही कुठे औषध मारायचे आणि कुठे औषध नाही मारायचे. साहेब मी स्वतः तुमच्या स्टाफला घेऊन, व्यवस्थित औषध घेऊन उभे राहून मारतो आणि साहेब ज्या दिवशी मारतो ना त्या दिवशी मी जेवू शकत नाही असा वास तो माझ्या घशामध्ये असतो ही फॅक्ट आहे. २ तासामध्ये माझी ही परिस्थिती होते. तशीच त्या कर्मचाऱ्यांची परिस्थिती होते म्हणून ते कर्मचारी काम करत नाही. तुम्ही बघा साहेब तुमचा टाईमींग सकाळी ७ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आहे परंतु कर्मचारी फक्त ४ ते ५ तास काम करतात. साहेब तुम्ही झाकण उघडून बघा मच्छर नुसते वरती येतात. वरचे मच्छर तर दुर खालचेच मच्छर आपण मारु शकत नाही आणि साहेब त्याची पॉलीसी असते की प्रत्येक औषध हे ८ दिवसानंतर मारावे लागते. आम्ही सखोल अभ्यास करुन बोलतो आम्ही अस चुकीचे नाही की विरोधी पक्षामध्ये असल्यामुळे विरोधी बोलणे अस अजिबात नाही. एका वॉर्डामध्ये मारुन मतलब नाही बाजुच्या वॉर्डामध्ये जर नाही मारलं तर ते मच्छर मरत नाही. साहेब आम्ही प्रशासनाला दोष देत नाही. परंतु काही चुका आहेत त्या चुका सुध्दा निघाल्या पाहिजे. दुसरी गोष्ट आहे टेम्पो सर आपल्याकडे फक्त ४ टेम्पो आहेत. तो टेम्पो सुध्दा व्यवस्थितपणे फवारणी करु शकत नाही कारण की आपली भौगोलिक परिस्थिती खूप वाढली आहे आणि ते ४ टेम्पो कमी पडतात. आपला स्टाफ प्रशिक्षित नाही आपण सगळी चांगली औषधे मागविती. सगळ करतो. परंतु साहेब बरोबर सिस्टमॅटिकली स्प्रे दिवसेंदिवस होत नाही त्याच्यामुळे साहेब हा प्रॉब्लेम होत आहे. दुसरी गोष्ट मी सांगतो डेंग्युचे साहेब डेंग्यू पण भरपूर आहे. आपल्यापर्यंत ती येत नाही. सर त्यात तुमची एक लसीकरण आहे ते चेंकींग करतो त्या चेकींगला पण २ दिवस लागतात रिपोर्ट येण्याकरिता आणि ते डॉक्टर पण रिस्क घेत नाही आणि म्हणून त्याच्यावर तो इमिजिएटली औषधोपचार करतो आणि तो डेंग्यूचा पेशंट बरा होतो. सर असे भरपूर या विषयामध्ये आहे तरी तुम्ही नीट अभ्यास करा आम्ही काही चुकीचा ठराव मांडलेला नाही. आम्ही काय म्हटल तुम्ही व्यवस्थित तुमच्या सुपरव्हायजरला कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ठिक आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १२२ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शहरात मच्छरांचा हैदोस, डेंग्यु व मलेरीयाचा शहराला विळखा.

**ठराव क्र. ९३ :-**

मिरा - भाईंदर शहरात गेले अनेक दिवसांपासून मच्छरांचे प्रमाण खुपच वाढले आहे. पालिके तर्फे मच्छरांवर नियंत्रण करण्याकरीता औषध फवारणी केली जाते परंतु ती फक्त नावाला, दाखवण्या करीता औषध फवारणीचा काहीही उपयोग होत नाही. मच्छरांचे प्रमाण वाढतच आहे. पालिकेचे लाख़ो रुपये गटाराच्या पाण्यात वाया जात आहे.

तसेच शहरात अनेक डेंग्यु व मलेरीयाचे रुग्ण आहेत परंतु पालीकेकडे रुग्ण शोधून आजूबाजूला औषध फवारणी करण्याकरीता रुग्ण शोधण्याची कोणतीही यंत्रणा नाही. डॉक्टर व हॉस्पीटल पालिकेला कळवत ही नाही तसेच पालीकेचे डॉक्टर डेंग्यु चे रुग्ण शोधुन उपाययोजना करण्याकरीता काहीही कार्यवाही करत नाही. सुमारे ४० Multi Purpose Worker मनपाने या मोहीमेसाठी व इतर कामासाठी घेतले होते. सुरुवातीला त्यांनी काम केले दोन वर्षापासून त्यांना दुसरे काम दिले जात असल्यामुळे या कामावर दुर्लक्ष झाले आहे. महापालिकेने मच्छरांनवर औषध फवारणी करणा-या कर्मचा-यांना व सुपरवाईसरला प्रशिक्षण दयावे तसेच धुर फवारणी (Fogging) पुन्हा सुरु करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२३, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (पूर्व) परिसरातील व रेल्वे स्थानका समोरील अनधिकृत लॉजवर कार्यवाही करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महासभा, मा. स्थायी समिती व मा. प्रभाग समिती मध्ये अनेक वेळा भाईंदर (पूर्व) परिसरातील अनाधिकृत लॉजवर कायदेशीर कार्यवाही करणे संबंधीत चर्चा झाली प्रशासनाने तत्वतः त्यावेळी मान्य ही केले परंतु आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्यामुळे अनाधिकृत लॉजेस सर्रास सुरु आहेत.

या लॉजेस मधील गैर प्रकारांमुळे तेथील स्थानिक महिलांना खुपच त्रास सोसावा लागत असून तो त्यांना असह्य झाल्याने हजारों महीलांनी स्वयंस्फुर्ती ने पोलीस स्टेशन वर मोर्चा काढला होता. तेथील परिसरात नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे. महापालिके तर्फे भाईंदर (पूर्व) परिसरातील अनाधिकृत लॉजेसचे परवाने रद्द करणे, वाढीव, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम पाडणे, पाण्याचे नळ जोडणी खंडीत करणे तसेच विज पुरवठा खंडीत करण्याबाबत मेसर्स रिलायन्स इन्फ्रा कं, टाटा पॉवर ई. कंपनीला लेखी कळविणे अश्या प्रकारची ठोस कार्यवाही करण्यात यावी व मा. महासभा दि. २९/०९/२०११ रोजी सुचनेस सर्वानुमते मंजूर झालेला ठराव क्र ६२ चे तंतोतंत पालन करण्यात यावे असे मी जनहितार्थ व कऴकळीने ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त महोदय, महापौर मॅडम भाईंदर पूर्वेला खरोखर ही गंभीर परिस्थिती आहे. अनेक नगरसेवकांनी रस्त्यावर उतरुन निषेध केला. पोलिस स्टेशनच्या बाहेर धरणा दिला काही समाजसेवक, नगरसेवकांवर केसेस दर्ज झालेत. या संदर्भात पोलिंसाना अनेकदा आमची चर्चा झाली. सर काही अशा टेक्नीकली बाब आहेत की तेही अडचणीत येतात आणि एखाद्या अशा लोकांना आणल तरी त्यांचा नियम असा आहे की ५०० रु. दंड जास्त असेल तर तेही सुटतात याच विषयावर ५-७ वर्षा अगोदर ज्यावेळी पोलिस प्रशासन आणि अधिका-यांबरोबर बैठक झाली त्यावेळी पोलिस प्रशासनाने एक विनंती केली होती की आम्हाला काही अडचण नाही पण आयुक्त साहेबांनी किंवा प्रशासनाने ठरवल तर ज्या इमारती असतील ते अधिकृत असतील पण ते लॉजींगसाठी आतुन मोठ्या प्रमाणावर त्या लोकांनी चेंजेस केले असेल तर तो कायदा घेऊन तुम्हाला कशाप्रकारे ते डिमॉलिश करता येईल आणि नक्कीच त्यासाठी पोलिस प्रशासन साथ देईल. पोलिसांनी काही केले तरी हे थांबवण्यासाठी काही मर्यादा आहेत आणि आपणही सांगितले अनधिकृत बांधकाम असतील तर त्याच्यावर आता काय जुन्या बांधकाम आम्ही जात नाही की किती १० वर्ष झाले ते बांधकाम पाडा पण असे जर शहराला नुकसानकारक होत असेल या नागरिकांना नुकसानदायक होत असेल तर अशा बांधकामावर आपण त्वरीत कारवाई करावी आणि परवानगी जरी असेल तरी इंटरनल चेंजेस केले असेल

साहेब तर ते डिमॉलिश करायला जेणेकरुन आणि ते पर्टिक्युलर एका क्षेत्रातच हे मोठ्या प्रमाणावर त्रास होतो शहरी भागामध्ये आपण त्यावर त्वरीत कारवाई करावी अशी विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, ज्वलंत विषय आहे. चर्चा होऊ द्या याच्यावर चांगला विषय आहे. मला आयुक्तांशी या संदर्भात थोडेसे बोलायचे आहे. हा ज्वलंत विषय पूर्ण शहराचा आहे. आयुक्त महोदय या सभागृहामध्ये ५-७ वर्षापूर्वी निर्णय घेण्यात आला होता असे जे लॉजिंग बोर्डिंग आहेत ते अनधिकृत आहेत कारण त्याच्यामध्ये त्यांनी बराच काही फेरफार केला आहे. अनधिकृत बऱ्याच लॉजिंग बोर्डिंगला घोषित करण्यात आले आहे. त्यांचे पाण्याचे कनेक्शन आणि वीज पुरवठा हे दोन्ही कापण्यात आले. बऱ्याच प्रमाणात यांची संख्या कमी झाली होती. परत त्यांना पाणी पुरवठा कोणी दिला, वीज पुरवठा त्यांना कसा प्राप्त झाला परत याची चौकशी तुम्ही लावा. फक्त हे लॉजिंग बोर्डिंग नाही तर हायवे परिसरामध्ये बघितले असेल तर सगळे जे काय लेडिज बार, महापौर मॅडम आपण एक स्त्री आहात तुम्हाला जाणीव असेल त्या विषयाची, हायवे परिसरामधून तुम्ही या मिरा भाईंदरमध्ये शिरल्यानंतर अस वाटते कुठेतरी हे बोलले नाही पाहिजे साहेब पण एक विचित्र दृष्य रात्रीच्यावेळी आम्हाला बघायला मिळते. त्यांनी अनधिकृत बांधकाम केलेले आहे आतमध्ये लॉजिंग उभ्या केल्यात त्या अनधिकृतमध्ये त्यांच्याकडे कुठल्याच प्रकारची परवानगी नाही. त्यांना अनधिकृत घोषित करुन त्यांच्यावर रितसर कारवाई करुन त्यांची, त्यांच्यावर सक्तीची कारवाई करावी.

**कल्पना म्हात्रे :-**

महापौर मॅडम, मला या विषयावर बोलायचे आहे मागे नरेंद्र मेहता महापौर असताना हा विषय झालेला आहे. आणि ४-५ नगरसेवकांवर त्यावेळी केस झाली आहे. आणि मागे मी आयुक्त साहेबांशी सुध्दा बोललेली आहे की ते पोस्टर आपण गेलेलो व्हिजिटला आणि आपण ते पोस्टर्स बघितलेले आहेत जे ब्ल्यु फिल्म दाखवतात त्याचे पोस्टर्स बाहेर लावलेले असतात आणि ते पोस्टर्स असे बाजारात जिथे बाजार भरतो, जिथे महिला लहान मुले फिरतात अशा ठिकाणी लागलेले आहेत. तेथे आजपर्यंत काही कारवाई झालेली नाही. मागे आयुक्त साहेब आले तेव्हा बघितलेले आपण जे रिलायंसचे केबल बघायला गेलेला त्यावेळेला तिथे आजपर्यंत काही कारवाई झालेली नाही. तर तुम्ही तिकडे तुमच्या अधिकाऱ्यांना सांगुन तिथे कारवाई करण्यात यावी. लॉजिंग बोर्डिंग हे सर्रास चालले आहे. आता आणि ज्यावेळी आपली तिथे कारवाई झाली त्यावेळा आपण असा कायदा पण काढलेला आणि ठराव केलेला की त्या लॉजिंग बोर्डिंगवर कारवाई करण्यात यावी. रिलायन्सचे आणि पाण्याचे ही कनेक्शन करण्यात यावे आणि ती कारवाई ठोस झालेली होती त्यावेळी आज पुन्हा ती कारवाई बंद झालेली आहे. राजरोसपणे तिथे व्यवहार चाललेला असतो. त्या महिला रस्त्यावर उभ्या असतात आणि त्या महिला अशा पध्दतीने हावभाव करत असतात की मुलांना आणि स्त्रीयांना खुप त्यामुळे अपमानीत व्हावे लागते ही कारवाई होणे खूप जरुरी आहे. मी आयुक्त साहेबांना सांगेन की हा गंभीर विषय आहे. त्याच्यावर त्यांनी लक्ष द्यावे. गांभिर्याने लक्ष देऊन तो विषय परिपूर्ण करावा. कारण हा विषय एवढा गंभीर झालेला आहे की भाईंदर (पूर्व) हा विभाग ब्ल्यू फिल्म सिटी म्हणून प्रसिध्द होण्यासाठी पूर्णपणे तिथे अशी वाच्यता होते. आमच्या परिसरात अस बोललेही जाते. तो गंभीर विषय तुम्ही पूर्ण करावा असे मला वाटते.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब कल्पना ताईंनी आता जे सांगितले तो विषय स्पेशली मार्केट एरियात आहे आणि त्याच्यावर तात्पुरती कारवाई केली जाते. त्याच्यावर ठोस काहीतरी कायमची कारवाई करा अशी आपणांस विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम गंभीर विषय आहे सभागृहामध्ये याच्याविषयी चर्चा झाली. अनेक वेळा सन्मा. नगरसेवक माझ्याकडे येऊन भेटलेले आहेत आम्ही त्यांना सूचना दिली होती की असा प्रकार पुढे होऊ नये म्हणून वेळोवेळी अधिकाऱ्यांना सांगण्यात आले परंतु माझ्या पण निदर्शनास आले आहे की त्याच्यामध्ये ज्याप्रमाणे ठोस कारवाई व्हायला पाहिजे त्याप्रमाणे झाली नाही. मी सभागृहाला वचन देतो की, आपली भावना विचारात घेऊन याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

**प्रकरण क्र. १२३ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (पूर्व) परिसरातील व रेल्वे स्थानका समोरील अनधिकृत लॉजवर कार्यवाही करणेबाबत.

**ठराव क्र. ९४ :-**

मा. महासभा, मा. स्थायी समिती व मा. प्रभाग समिती मध्ये अनेक वेळा भाईंदर (पूर्व) परिसरातील अनाधिकृत लॉजवर कायदेशीर कार्यवाही करणे संबंधीत चर्चा झाली प्रशासनाने तत्वतः त्यावेळी मान्य ही केले परंतु आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्यामुळे अनाधिकृत लॉजेस सर्रास सुरु आहेत.

या लॉजेस मधील गैर प्रकारांमुळे तेथील स्थानिक महिलांना खुपच त्रास सोसावा लागत असून तो त्यांना असह्य झाल्याने हजारों महीलांनी स्वयंस्फुर्ती ने पोलीस स्टेशन वर मोर्चा काढला होता. तेथील परिसरात नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे. महापालिके तर्फे भाईंदर (पूर्व) परिसरातील अनाधिकृत लॉजेसचे परवाने रद्द करणे, वाढीव, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम पाडणे, पाण्याचे नळ जोडणी खंडीत करणे तसेच विज पुरवठा खंडीत करण्याबाबत मेसर्स रिलायन्स इन्फ्रा कं, टाटा पॉवर ई. कंपनीला लेखी कळविणे अश्या

प्रकारची ठोस कार्यवाही करण्यात यावी व मा. महासभा दि. २९/०९/२०११ रोजी सुचनेस सर्वानुमते मंजूर झालेला ठराव क्र ६२ चे तंतोतंत पालन करण्यात यावे असे मी जनहितार्थ व कळकळीने ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२४, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर मनपा हद्दीत अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामात मोठ्या प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्या बाबत थातुर-मातुर कार्यवाही होते. नुकताच दि. १९ नोव्हेंबर २०१५ रोजी दै. लोकसत्ता च्या अंकात "अनाधिकृत झोपड्यांवर कार्यवाहीचा देखावा" फोटो सहीत बातमी प्रसिध्द झाली आहे. तसेच दैनिक व स्थानीक दैनिक, साप्ताहीक मध्ये बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम संबंधीत बातम्या सतत प्रसिध्द होत असतात.

केंद्र व राज्य शासन, महानगरपालिकेच्या आरक्षणातील जमीनीवर, खाजगी, आदिवासी, CRZ बाधीत, ना विकास क्षेत्रात इत्यादि. जमीनीवर अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामे सर्रास व राजरोसपणे सुरु आहेत. केंद्र व राज्य शासनाचा जमीनीवर झोपड्या, चाळी, जुन्या गाळांच्या वाढीव बांधकाम, इमारतींच्या बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामांच्या बाबत असंख्य तक्रारी महानगरपालिका, विभाग प्रमुख, अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम नियंत्रण कक्ष तसेच प्रभाग अधिका-यांकडे येत असतात. तरी देखील कोणतीही ठोस कार्यवाही प्रशासनाकडुन होत नाही. मा. उच्च न्यायालय व मा. जिल्हा न्यायालय, ठाणे, यांच्याकडुन अनेक दाव्यांमध्ये स्थगिती आदेश ऊठलेली असले तरी प्रशासनाकडुन बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तसेच अतिक्रमण काढण्याची व पाडण्याची कार्यवाही होत नाही.

तत्कालीन आयुक्त श्री. विक्रम कुमार (भा.प्र.से) यांनी मिरा-भाईंदर शहरातील व राष्ट्रीय महामार्ग पट्टयातील बेकायदेशीर बांधकाम तोडण्यात आलेला होता त्यावेळी मेसर्स रिलायन्स एनर्जी यांनी दिलेला विज पुरवठा खंडीत करून मीटर काढ़ण्यात आले होते. परंतु पुन्हा प्रशासनाला हाताशी धरून सदर बेकायदेशीर बांधकामांना विद्युत पुरवठा देण्यास शिफारस करण्यात आलेली आहे. अनेक वेळा तक्रारदारांच्या तक्रारी नंतर नोटीस काढुन त्यांना मा. न्यायालयामधुन स्टे आणण्यासाठी संधी दिली जाते. महानगरपालिकेच्या विधी विभागाकडुन केवीयट मा. न्यायालयांमध्ये दाखल करण्यात येत नाही त्यामुळे बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम करणा-यांना स्टे मिळुन जाते व अनेकवेळा मनपाचे वकील देखील तारखेला गैर हजर असतात. अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार निरोधक ब्युरो ठाणे यांनी रंगेहाथ अटक केलेल्या प्रभाग अधिकारी यांना, तसेच प्रभाग अधिकारी हे अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्यास कसूर केल्याबद्दल त्यांना मा. आयुक्त यांनी निलंबीत केलेली आहे. असे असताना देखील पुन्हा त्याच अधिका-यांना अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, प्रभाग अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली या बाबत संपूर्ण शहरांमध्ये चर्चा व अनेक वर्तमानपत्रांमध्ये बातमी छापून आलेली आहे. अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्यास, मा. न्यायालयाच्या आदेश व शासनानी वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णय, शासन परिपत्रक, मा. महासभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आलेली ठराव तसेच तत्कालीन आयुक्त श्री राजीव रंजन जाधव साहेब यानी काढलेली कार्यालयीन आदेशाचे उल्लंघन, निष्काळजीपणे कर्तव्यात हयगय केल्याबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ५६ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

मिरा-भाईंदर मनपा हद्दीत केंद्र व राज्य शासनाच्या जमीनीवर मोठ्या प्रमाणामध्ये झोपड्या बांधुन विक्री केली जाते. या जमीनीवरील तिवरीचा झाडांवर (मॅन्ग्रोव्हस) कचरा व डेब्रीसचा भरावा करून, बांबू प्लास्टीक शीटनी जागा आढ़वून गरीब, कष्टकरी लोकांना फसवून विक्री केली जाते त्यामध्ये समाज कंटक, हाथ भट्टी दारू विक्री करणा-यांची टोळी, गुन्हेगारी प्रवृत्तींची माणसे तसेच बांगलादेशीय नागरीक वास्तव्य करीत असल्याचे दिसून येते. शासकीय जमीनीवर झोपड्या बांधून विक्री करणारे लोकांच्यावर स्थानीक पोलिस ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्या विरुध्द संगठीत गुन्हा कायद्यांतर्गत "झोपडपट्टी माफीया" म्हणून त्यांना मिरा-भाईंदर मनपा हद्दीतून हद्दपार करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींची माणसे यात आश्रय घेत असल्यामुळे मिरा- भाईंदर शहराला धोका निर्माण झाला आहे. उपरोक्त बाब अत्यंत गंभीर असून संबंधीत सर्व जबाबदार अधिकारी यांना जबाबदार धरून त्यांच्या विरुध्द मा. आयुक्त यांनी

शिस्तभंग, कर्तव्यात हयगय, निष्काळजीपणा केल्याबद्दल कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझ अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब अनेक शहराच्या बाबी आहेत. ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी शहराच्या हिताची भावना लक्षात घेऊन ठराव मांडलेला आहे. आणि आम्ही सहमत आहोत त्या विषयाशी आम्ही तुम्हाला दोष नाही देत पण प्रभाग अधिकारी म्हणजे उदाहरण एवढे आहेत की मी छोट्या-छोट्या बांधकामात जात नाही. मिरारोड रेल्वे स्टेशन किती मेहनत घेऊन त्या बिल्डरची कंडीशन ऐकून त्याचे ऑफिस काढायला घेतले एखादा शांतीनगर शॉपिंग सेंटरवाले त्याच्यावर आपल्याला अडकवतात. इललिगल बांधकाम त्यांनी केले आणि आपल्या पूर्ण रस्याचे काम मिरारोडचे सुंदरीकरण हे त्या स्टेमुळे थांबलेले आहे. हा स्टे कधी आला आता आला. दोन महिन्याअगोदर कारवाई कधी करायची होती ६ महिन्यांपासून स्वप्नील सावंत आपण स्वतः जागेवर घेऊन अनेकदा आपण सांगितले कारवाई करा. कारवाई करा. कोणी कुठली कारवाई केली नाही. आज काय झाले त्यांनी तुमच्या हातात स्टे दिला ८ करोड रुपये आपण खर्च करतोय. मिरारोडच्या सुंदरीकरणला आणि त्याच्यावर स्टे म्हणजे पुढचे काम आम्ही करायचे नाही. आणि त्यानंतर त्यांनी स्टे आणला ठीक आहे. पण त्या शांती शॉपिंग सेंटरमध्ये एकेक व्यक्तींनी म्हणजे जो त्या शांती शॉपिंग सेंटरचा अध्यक्ष आहे रश्मी बिल्डर्स त्यांनीच पुढे टेरेस कव्हर केले. २ हजार फुटाचे त्यांच्यावर तुम्हाला कारवाई करता येत नाही का? त्याने आम्हाला रस्त्यावर स्टे आणून दिला. आमची जागा असताना तर त्यांच्यावर तुम्हाला अशा अनेक बाबी लक्षात आणून सुध्दा आपल्याकडून आणि प्रभाग अधिका-यांकडून कारवाई होत नाही. आम्ही रोज हेच करायचे का? अशाप्रकारे आम्ही ठराव आणायचे आणि अंगावर घ्यायचे मग एखाद्याने ध्रुवकिशोर पाटीलला फोन करायचे नाहीतर मला करायचे किंवा नंतर खोटी बातमी द्यायची. मग या अशा अधिका-यावर गंभीरपणे काय कारवाई कराल ते बांधकाम वर करा. या अधिका-यांवर काय करायचे तेही आज आम्हाला आपल्याकडून उत्तर पाहिजे. आपण दुसरा विषय घेतला तर विनोद त्रिवेदी नावाचा बिल्डर योन पेपरला पोलिस स्टेशनला अर्ज केला म्हणजे चुक काय झाली मला जर माहित होत की मी महापौर असताना त्या सोसायटीच्या आर.जी,च्या जागेमध्ये ते बांधकाम त्यावेळी मी थांबविले होते. मला चांगल माहित होते हे आर.जी. आहेत. त्याचे बांधकाम चालु झाले इकडे माहिती मागवली त्याने पोलिस स्टेशनला जाऊन सांगितले की, नरेंद्र मेहताने २ करोड रुपये मागितले आणि घेवारे साहेबांनी मागितले. त्यासाठी त्यांनी एफ.आय.आर. दाखल केले. नयानगर पोलिस स्टेशनमध्ये यापूर्वी त्यांनी काय केले होते तो म्हणतो मला परवानगी नाही दिली तर धनेगावे साहेबांना सांगितले की मी सुसाईड करणार २ वर्षाअगोदर म्हणजे असा ब्लॅकमेलर तुम्हाला ३ वर्षाअगोदर पत्र देतो की मला परवानगी नाही दिली तर सुसाईड करणार नंतर तो आमदाराला सांगतो की, २ करोड मागितले हे ठिक आहे की हे झाले नव्हते पोलिसांनी इन्वीस्टीगेशनमध्ये त्याच्यावरच गुन्हा दाखल केला खोटी तक्रार दिली म्हणून आपल्याकडून जबाब दिले गेले. परंतु सत्य परिस्थिती काय आहे. त्या आपल्या अधिका-यांनी त्याला दोनदा परवानगी दिली. एकाच बिल्डींगला ते एफ.एस.आय. मॅक्डॉनल्डला वापरलं आणि परत याच्यावर परवानगी दोनदा परवानगी दिली आणि आपण त्यावर निर्देश दिला बांधकाम इललिगल आहे तोडा, खेत्रे साहेबांनी काय केले जाऊन जीपला जोडले वरचे एक पीलर खाली तोडून आले किंवा २ पीलर तोडले त्यानंतर आपण माझ्यासमोर त्यांना फोन केला की इमिजिएटली ती कारवाई करा, कुठलीही कारवाई झाली नाही त्या बिल्डरने परत बांधले आता तुमच्या हातात स्टे दिला त्याने परत काम चालु केले म्हणजे आम्ही बदनामी घ्यायची, २ करोडचा आरोपही सहन करायचा. अधिका-यांनी पैसे घ्यायचे आणि परत बांधकाम चालु करायचे. बदनाम आम्ही आणि ठरावही आम्ही आणायचा. लोकांशी दुश्मनी आम्ही करायची त्या अधिका-यांकडून मला आज सभागृहात शब्द पाहिजे की आरोप लावला तरी महानगरपालिकेवर पण लावले आणि माझ्यावरही लावले. तसं असताना तुम्ही दोनदा एफ.एस.आय दिला. आज त्या एकाच सर्व्हे नंबरला २ बिल्डींग मंजूर आहे एक इकडे एक इकडे कस होऊ शकतो हो? आणि अजुन आपल्याकडून परवानगी रद्द केली गेली नाही त्या अधिका-याला काही माहित पडत नव्हत. दोनदा परवानगी देतो. आणि आपली सही आहे साहेब त्याच्यावर आपल्याकडून निर्देश दिशाभूल करुन घेतले कसं घेतले मला माहित नाही एका जागेवर दोनदा बिल्डींगची परवानगी आणि वरुन आमच्यावरच आरोप तो सावकार पेपरला बातम्या अस मागितल तसं मागितल आणि अपमान सहन करायचा आम्ही. हे तर बर झाल पोलिसांनी केल नाही तर आम्ही काय केल असतं. परत तो काय बोलतोय मी सुसाईड करणार नरेंद्र मेहतावर कारवाई नाही केली तर म्हणजे अशा प्रकारची भाषा आणि आज असं झाल आहे. मी सर्वच बिल्डरला दोष देत नाही पण काही ठराविक बिल्डर ते सूरज परमारचे उदाहरण घेऊन आपली रोटी शेकायला लागले अधिका-यांना दम द्यायला धनेगावे साहेब तक्रार केली तर सुसाईड करेल नरेंद्र मेहताने तक्रार केली तर सुसाईड करणार अशा प्रकारची परवानगी आपण देतील तर मला आपल्याकडून अशा अनेक बाबी आहेत. खेत्रे साहेबांच काय झाल त्या वॉर्डात ते प्रभाग अधिकारी होते त्या कामाशी आपण सहमत नव्हते म्हणून त्याला निलंबित, तुम्ही काय केल त्याला विभाग प्रमुख करुन टाकल उलट केले. पहिले त्यांच्याकडे गाव होते ते सक्षम न होता तुम्ही पूर्ण शहर देऊन टाकलं. आपली अनेकदा चर्चा झाली कुठे आहे कारवाई साहेब मला सांगा ना. छोट्या-छोट्या बाबी बॉन्ड्री रस्ते हे ते त्यांना जे काम करायचे ते त्यांना माहिती आहे आणि आपल्याकडे त्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत मला

सांगायला नको. त्या लोकांनी दुकान चालवलेले आहे. आपल्याला विनंती आहे की सभागृहाला आपण न्याय द्यावे आणि जे-जे प्रभाग अधिकारी दोषी असतील एखाद्या नगरसेवकाने अनधिकृत बांधकाम केले तुम्ही त्याच्यावर कारवाई करता डिसकॉलीफिकेशनची प्रोसेस करतात. तुमच्या अधिका-यांवर काही कारवाई करता येत नाही का? आणि सगळ्या अधिका-यांना आज समजले आहे की सस्पेंड झाले तरी काही हरकत नाही भाजपने केले तर कॉंग्रेसकडे जायचे, कॉंग्रेसने केले तर भाजपकडे जायचे आणि आपल काम करुन परत रुजु व्हायचे. आता सस्पेन्शन नको. तो दोषी असेल त्याला बडतर्फ म्हणजे ना रहेगा बास ना रहेगी बासुरी. विषय त्यात डिटेल मध्ये गेले साहेब तर खूप गंभीर आहे मी काही डिटेलमध्ये जात नाही. सासायटीच्या छोट्या तक्रारी होत नाही एक बिल्डींगवर वॉचमनने टेरेसवर फ्लॅट बांधला आपण काही करु शकले नाही. तो पूर्ण बिल्डींगला वेटेज धरतो कोर्टात आपण १-१ केसला २०-५० लाख खर्च करतो. करायच त्यांनी खर्च आम्ही करायचा. मागे आम्ही लागायचे, बदनामी आम्ही शहरात इललिगल बांधकाम वाढलं विरोधक तर आम्हालाच दोषी ठरवणार तुम्हाला नाही. सर आपल्याला खास विनंती याच्यावर आपण गंभीरपणे घ्या. आणि यापुढे साहेब जस तुम्ही नगरसेवकांना दोषी ठरवतात इललिगल बांधकामामध्ये किंवा इललिगल कामात अडथळा आणलं तसं त्या अधिका-यांना सुध्दा दोषी ठरवा आणि त्यांच्यावर कारवाई करावी अशी आमची मागणी आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब तुम्हाला देखील आता या विषयावर चर्चा झाली परंतु स्टेपर्यंत चर्चा झाली स्टे घेतल्यानंतर पुढची जी प्रोसीजर असते टेम्पररी स्टे असतात तर ते टेम्पररी स्टे का काढण्यात येत नाही विधी विभाग कुठेतरी कमी पडत आहे का? आतापर्यंत बरेच अशी प्रकरणे आहेत की टेम्पररी स्टे घेऊन पुन्हा-पुन्हा ते वाढवले जातात मग जेव्हा पुन्हा वाढवण्याची वेळ येते त्याचवेळी तो स्टे नष्ट का केला जात नाही? म्हणजे कुठेतरी विधी विभागाची साथ आहे का? किंवा काय आहे ते तुम्ही त्याच्यावर स्वतः लक्ष घाला आणि आतापर्यंतचे जेवढे स्टे घेऊन मोठमोठ्या बिल्डींग ज्या बांधलेल्या आहेत त्यावरचा स्टे उठवून ताबडतोब त्याच्यावर कारवाई करावी अशी मी आपणांस विनंती करते.

**अशरफ शेख :-**

महापौर मॅडम, आता मेहता साहेबांनी जे सांगितले ते त्याच विषयाला धरुन मी बोलतो माझ्या प्रभागामध्ये ३४ नंबर नरेंद्र पार्क परिसरात, इन्होंने जैसे इललिगल बांधकाम के बारे में बताया है वहाँपर किसी १ महिलाने १ लोखंडी का १० बाय १० का बडा दुकान लाके उसने रोडपे रख दिया। २ महिने पहिले मैंने उसका प्रभाग अधिकारीसे कम्पलेंट किया। प्रभाग अधिकारीने उसपे कोई कारवाई नही की उसके बाद मैं प्रभाग अधिकारी को लेके वहाँ पे गया मैंने वो जगह बताया वहाँ पे उसके बाद थोडीसी कारवाई हुई बादमे पता चला की उसको महानगरपालिका ने परवाना दिया। बांधकाम नाले के उपर और वो भी १० बाय १० फुट का और उसपे म्युनिसिपल कार्पोरेशन परवानगी देती है। उस परवानगी के विरोध में मैंने लेटर दिया की यह परवानगी कैसे दि गई इसको रद्द करो तकरीबन उसको देके १ महिना हो गया है। अभी तक उसपे कोई कारवाई हुई नही है। मॅडम जिसने यह बांधकाम किया है उस महिला ने मेरे विरुध्द मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री कार्पोरेट, म्युन्सिपल कमिशनर. एस.पी. को लेटर दिया है की मैं उसको तकलीफ देता हूँ। जब की ऑन रेकॉर्ड है मैंने आजतक उसका नाम भी नही जानता, ना मैंने उसको फोन किया, न उसने मुझको फोन किया, सिर्फ वो ठाणा का जो प्रकरण हुआ था उसी गुन्हे के उपर अगर इसने मुझपे कारवाई की तो मैं खुदखुशी कर लुंगी। याने यह जो ठाणा का प्रकरण हुआ है खुदखुशी का यह अब सारे लोग जो अनधिकृत काम करते है ये लोगो को खुदखुशी की धमकी देते है। और पालिका उसपे कुछ नही करती। मैं बताता हूँ आपको मैंने यहाँ से मालुम किया तो पता चला यह जो परवानगी दिया है वो परवानगी देनी की वजह क्या है, रोड पर है, नाले पर, इललिगल मॅडम मैं २ महिना पहले लेटर दे चुका हूँ। कोई कारवाई नही हो रही थी तो मैंने प्रभाग अधिकारी को एक एस.एम.एस किया, एस.एम.एस करने के बाद में उस प्रभाग अधिकारीने एस.एम.एस का रिप्लाय करना भी मुनासिम नही समजा। मैंने अभी सुबह उनको फोन किया सर मैं बताता हूँ यह सारे मिले हुए है। कोई कारवाई होती नही है और उसके बाद हम बदनाम हो जाते है।

**वर्षा भानुशाली :-**

आयुक्त साहेब अपना मिरा भाईंदर शहर अनलिगल बांधकाम और मच्छरोके लिए फेमस है। बॉम्बे से जो भी लोग आते है। वो यही चीज से डरते है। अभी मेरे पास एक बंदा आया था उसे मिरारोड में फ्लॅट लेना था। उसने मुझे बोला की, मॅडम यह बिल्डींग लिगल है की अनलिगल है, मुझे चेक करके बताओ नही तो मुझे तीन गुना टॅक्स भरना पडेगा हमेशा के लिए। मैंने उसके लिए लेटर लिखा था नगररचना में ५/१०/२०१५ को और ३०/१०/२०१५ को, अभी तक मुझे कुछ भी डिटेल नही मिल रहा है। एक नगरसेवक होने के बाद में एक मामुलीसी बात की माहिती लेना चाहती हूँ की यह बिल्डींग लिगल है उसको ओ.सी. मिला है। परमिशन मिली है की नही उसका भी लेटर हमको नही मिल रहा है। जो पब्लिक है वो आके रहेगी, अच्छे से बिल्डींग देखेगी और हमेशा के लिए ३ गुना टॅक्स भरेगी वो। इसके लिए अभी मुझे आयुक्त साहेब विक्रम कुमार की याद आ रही है। जो लोग कापते थे यह चीज करने के लिए और आज तो बेझिझक चालु है। कही पे भी डी.पी. रोड हो वहाँ पे भी अनलिगल बन रहा है। हमको भी समझमें नही आता की हमारे वॉर्ड में क्या चल रहा है। और जब फोन करते है तो अधिकारी या कोई भी सिनिअर ज्युनिअर किसी का नाम नही लेना चाहूँगी लेकिन निचेसे उपर तक हमको कुछ अलगही आन्सर मिलता है। तो सर यह क्या

है? आपके होते हुए मुझे नही लगता है की यह होना चाहिए। आप थोडासा स्ट्रिक्टली हो जाओ जो हमारा भाईंदर बदनाम है उसको थोडा तो सुधारो। और सर मुझे यह माहिती कब मिलेगी।

**मा. आयुक्त :-**

घेवारे सर को बुलाया है। आपने जो परमिशन की माहिती मंगाया है तो वो क्यों नही दिया करके।

**वर्षा भानुशाली :-**

वो पुछो और माहिती दो।

**जुबेर इनामदार :-**

विषय "ज" चा प्रस्ताव अतिक्रमण पालिकेच्या आरक्षित भुखंडासंदर्भात बऱ्याच लोकांनी यावर चर्चा केली. आमदार मा. नगरसेवक नरेंद्र मेहता साहेबांनी त्याचा उल्लेख चांगला त्यांच्या भाषणामध्ये केला आहे. मुंबईच्या धर्तीवर रोज आम्ही वर्तमान पत्र माध्यमातून वाचत आहोत. मुंबईच्या धर्तीवर कितीतरी असे भूखंड ते खाजगी संस्थांना देण्यात आले होते त्याचा दुरुपयोग होत होता ते परत घेण्याचे आदेश त्यांना सध्या परत घेण्याचा आदेश मा. मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. त्याला कारण असच घेतलेले भूखंड नागरिकांच्या सोयी सुविधासाठी असायला पाहिजे होते ते सोडून त्यांनी स्वतःच्या त्यातुन कसा फायदा घेता येईल. त्यावर घेतलेल्या लोकांनी संस्थांनी बरेच नेतेसुध्दा त्याच्यामध्ये असतील त्यांनी स्वतःचा फायदा कसा घेता येईल त्या धर्तीवर त्यांनी काम केले. मिरा भाईंदरमध्ये कितीतरी असे भूखंड आम्ही खाजगी संस्थांना दिलेले आहेत. आरक्षित भूखंड आहे त्याच्यावर न्यायालयात न्यायप्रविष्ठ झालेले न्यायलयाचे त्यावर आदेश आहेत ते असताना सुध्दा प्रशासन ते गंभीरपणे घेत नाही त्यावर कुठली कारवाई करत नाही. या सभागृहामध्ये एक ठराव पारित झाला होता. सेव्हन इलेव्हन संदर्भात त्याला पिटीशन फाईल करण्यात आली होती. प्रिटीशनर साजी. आय.पी. व्हर्सेस स्टेट ऑफ महाराष्ट्र अदर्स अबव्ह ॲक्टच्या खंडपीठाने रुलिंग दिली आहे त्याच्यावर मी तुम्हाला वाचुन दाखवतो. कमिशनर साहेब तुमचा हा विषय आला होता. ॲडमिटेड पोजीशन दॅट द पोर्टल चिफ रिस्पॉन्डन्ट आय एक्सक्लुजीव युजींग द पार्ट ऑफ द ओपन पोर्शन फॉर द ओन पर्पज ॲन्ड नो पार्ट ऑफ एस्केप ऑल द मेंबर्स ऑफ द पब्लिक टू यज इट ॲज अ प्ले ग्राऊंड. आपल प्ले ग्राऊंड होत त्याला ओपनला जात आहे. त्यापासून त्यांना जो फायदा उचलून घ्यायचा होता तो त्यांनी घेतलेला आहे. कोर्टाचा आपल्याकडे आदेश आहे. त्याच्यावर तुम्हाला स्टे फाईल करायला सांगितले आहे. आदेश जागेवर असताना सुध्दा प्रशासनाने त्याच्यावर आपली स्वतःची काय भूमिका घेतली रिडायरेक्ट द म्युनिसिपल कार्पोरेशन टू फाईल अ रिप्लाय डिलींग द इश्यू ऑफ इम्प्लीमेंटेशन फॉर द रिझर्व्हेशन ऑफ प्ले ग्राऊंड. सर इतके स्पष्ट आदेश असताना सुध्दा प्रशासन कारवाई करत नाही. मी एका व्यक्तीवर किंवा एका संस्थेवर टिप्पणी टिका करत नाही ही परिस्थिती पूर्ण शहराची आहे. पूर्ण शहरामध्ये याचे आपल्याला अवलोकन करावे लागेल असे आपले किती रिझर्व्हेशन खाजगी संस्थांना देण्यात आले आहे त्याचा गैरवापर केला जातो. गरजेचा विषय आहे. अतिक्रमणच्या विषयावर चर्चा चालु असताना जाणुन बुझुन हा विषय मी तुमच्यासमोर मांडतो आहे. रवि ग्रुपचा या सन्मा. सभागृहामध्ये नरेंद्र मेहता साहेबांनी हा विषय उचलला होता. सन्मा. नगररचनाकार धनेगावे साहेब होते. रवि ग्रुपमध्ये २०१२ साली तत्कालीन आयुक्तांनी एक पत्र रवि ग्रुपला दिले की तुम्ही सी.सी.चे रस्ते करा. भाषणानंतर असे वाटते फक्त आणि फक्त त्या विकासकाला मदत करण्यासाठी, त्या अनधिकृत बांधकामाला मदत करण्यासाठी अधिकृत करुन देण्यासाठी पैसे पाहिजे आणि सफाई करताना नगररचनाचा काहीच त्याच्यामध्ये उल्लेख नाही ते काय करता सिटी इंजिनिअर त्याच्यामध्ये फक्त काय, रस्ता केलेला आहे तो तांत्रिक बाबीने योग्य आहे की नाही तेवढच त्याच्या पलीकडे काहीच नाही कुठल्या कायद्याच्या चौकटीमध्ये त्याला टी.डी.आर. देता येईल. त्याचा कुठेच उल्लेख केलेला नाही. साहेब अशाप्रकारे टी.डी.आर. आम्ही द्यायला लागतो. फक्त न्यायालयाने आम्हाला सांगितले म्हणून कारण आम्ही न्यायालयाला आपली बाजू मांडलीच नाही त्याला पूर्ण शहर एकदम फाटेल प्रत्येक व्यक्ती तुमच्याकडे डी.पी. प्लान तुम्हाला तयार करुन देतो. माहिती हक्काचे किती रोड आहेत मला त्याचा तुम्ही टी.डी.आर. द्या. साहेब आजच सकाळी पत्र प्राप्त झालेला आहे. अंगणवाडी विकास योजना, २.५ भाडे तत्वावरील गृहनिर्माण १२४ अशाप्रकारे आपल्याकडे आाधीच या शहरामध्ये मोठमोठे प्रकल्प चालू आहेत. शहरामध्ये ७०,८० तासानंतर पाणी देतो येणारा ७५ एम.एल.डी. पाणी आमदार आपल्याला पुरणार नाही अशाप्रकारे कामकाज चालत आहे. तुम्हाला ७५ नाही साडे सातशे एम.एल.डी. पाणी अजून उपलब्ध करुन घ्यावे लागेल ते कुठून आणणार तुम्हाला ही माहिती नाही आणि आम्हालाही माहित नाही निसर्गाचा वंश आहे पाऊस नाही. तर पाणी नाही ४८ टक्के पाऊस पडला नाही. दीड हजार गावांना सुका घोषित केला आहे. महाराष्ट्र शासनाने, या शहरामध्ये आज पाणी नाही, आणि अशा परिस्थितीत अशाप्रकारे कुठलाही विकास करताना प्रशासनानी मदत करायची हे योग्य आहे. या डि.सी. रुल एकदम स्पष्ट आहे. याच्यामध्ये कलम चुका दिलेल्या आहेत की बाबा तुम्हाला काय समजल नाही कारण डि.सी. रुल शासनाने तयार करुन दिले आहे. तुम्हाला याच्यामध्ये कुठला विषय समजला नाही, तुम्हाला त्याची इंटरपिटीशन समजा जमली नाही तर तुम्ही शासनाकडे जा. या विषयावर कोण शासनाकडे गेला की आम्हाला देता येईल की नाही, कायद्यात कुठेच बसत नाही नगररचनाकाराने यावे आणि आम्हाला सांगावे याचे स्पष्टीकरण द्यावे असा कायद्यात बसू शकतो की नाही यांच्याकडे उत्तर मला माहिती आहे येथे मला काय उत्तर प्राप्त होणार आहे. हा विषय आम्ही अजून ताणून धरला आहेत ते होणारच आहे. माझा फक्त आयुक्त महोदय तुम्हाला विनंती आहे या सभागृहामध्ये या शहरवासियांच्यावतीने हा शहर उभआडव फालवू नका. लोकसंख्या इतकी अफाट वाढेल ज्याप्रकारे काम चालू आहे हे शहर भोगू शकणार नाही. सांभाळु शकणार

नाही. रिझर्व्हेशनचे विषय आहेत अनधिकृत बांधकाम साहेब, पदनिश्चित अधिकारी ज्यांना त्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांच्या काळामध्ये जे अनधिकृत बांधकाम होते त्याच्यावर आपण काय कारवाई करतो ती नेमकी स्पष्ट बोलतात त्यांच्यावरती तुम्ही बडतर्फाची कारवाई करु शकतात. आम्ही करतच नाही २६० चे किती तरी साहेब नोटिसी दिल्यानंतर त्याच्यावरती कारवाई करण्यात आलेली नाही.

**मा. महापौर :-**

आपण बसून जा. विषय डायव्हर्ट होत आहे आता.

**जुबेर इनामदार :-**

अतिक्रमणचाच विषय आहे, मी विषय धरुनच बोलतोय महापौर मॅडम.

**भगवती शर्मा :-**

मॅडम यह विषय ऐसा गंभीर है की, प्रशासन की दिशाभूल कर रही है।

**जुबेर इनामदार :-**

हा अतिक्रमणचा विषय नाही तर काय?

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी अतिक्रमणवर स्कुलवर गेली, नंतर डी.सी. रुलवर गेली, नंतर टी.डी.आर वर गेली नंतर एम.एम.आर.डी. वर गेली म्हणजे जुबेर इनामदार जरा खाली माहितीसाठी जस्ट सांगतो. कुठलीही शाळा मिरा भाईंदरची कुठलीही एमी रिझर्व्हेशन, मग ते एन.एच. हायस्कूल असु द्या, मुजफ्फर साहेबांनी आता नवीन कॉलेजची परवानगी दिली ती असु द्या, त्या प्रत्येक रिझर्व्हेशनमध्ये हायस्कुल आणि प्ले ग्राऊंड म्हटले आहे प्रायमरी स्कुल आणि प्ले ग्राऊंड म्हटले हा डी.पी. प्लान आहे. कुठलाही आरक्षण बघा हा जो प्ले ग्राऊंड असतो त्या नियमातला डी.सी. रुलचा ४० टक्के जागा त्या आरक्षणाची त्या विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्ले ग्राऊंड म्हणून वापराव त्याचा रिझर्व्हेशनचा अर्थ असा आहे असा अर्थ नाही हे की महापालिकेला द्याव की इतरांना द्यावे आणि द्यायची तयारी असेल तर त्यांनी आपल्या नेत्याला सांगा ते एन.एच. स्कुल असु द्या नंतर तुमचे नविन स्कुल असु द्या.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

हायकोर्टाचा आदेश आहे.

**नरेंद्र मेहता :-**

राहीला प्रश्न कोर्टाचा आदेश कोर्टात अजून न्याय प्रविष्ठ आहे. कोणत्याही अंतिम निर्णय झालेला नाही हे एक मॅडम दुसरा असा विषय आहे हा विषय आम्ही जास्त काय घेत नाही अंतिम निर्णय होईल त्यावेळी जो कोर्टाचा आदेश होईल जो कोणी असेल त्याला मान्य करावा लागणार याच्या काही दूमत नाही हे मी प्ले ग्राऊन्ड व्याख्या सांगितली की प्ले ग्राऊन्डची व्याख्या काय आहे राहिला प्रश्न आता टी.डी.आर. चा त्यावेळी आम्ही ओरडून बोललो होतो देऊ नका टी.डी.आर आपण ठराव केलाना बहूमतांनी रवी ग्रूपला टी.डी.आर द्या आम्ही केला होता का ठराव.

**जुबेर इनामदार :-**

केलेला ठराव डी.सी. रूल प्रमाणे शासनाकडे गेला स्पष्ट ठराव आहे तो.

**नरेंद्र मेहता :-**

आज रवी ग्रूपला ज्या डी.सी रूलचा म्हटले आपल्या सत्ता असता त्याला वर्क ऑर्डर दिली ना आपण का वर्क ऑर्डर का कोर्टात सांगितल का नरेंद्र मेहतानी सांगितल तुम्ही तुमची सत्ता असता त्याला वर्क ऑर्डर दिली तुमच्याकडून आपण सारखे सारखे पैसे भरत असत त्या कोर्टामध्ये हे अपील ते अपील कोर्टाने अनेकदा फटकार लावले तुम्ही त्याचानिर्णय द्या आणि शेवट तर त्यांनी सांगितल की एवढे दिवसात तुम्ही निर्णय द्या आणि कुठे तो निर्णय घ्यावे लागले आणि आपल्या माहितीसाठी जुबेर इनामदारजी. टी.डी.आर. दिला नाही का लोकसंख्येवर फरक वाढणार नाही आम्ही उत्तर देतो ना कारण काय रिसेलिंग जो पॉईंट एकच आहे तो का दोन होत नाही. जिकडे टी.डी.आर चा वापर करत होतो तेव्हा पुरताच करतोय म्हणजे उदाहरण सांगतो ९० कोट टी.डी.आर. आला. ९० कोटला वापर होणार अशातला भाग नाही तो पॉईंट ८ आहे तो पॉईंट आठच राहणार. एक इंच कमी होऊ शकत नाही. एक इंच संख्या वाढू शकत नाही. एक कमी होऊ शकत नाही आपल्या माहितीसाठी सांगतो रोडचा टी.डी.आर १० फुट निघाला. १० फुट कन्स्ट्रक्शन आहे अशातला भाग नाही. जेवढी आर.झोन जमिन आहे जेवढी आर झोन पॉईंट एकच वापरता येईल राहिला साहेब आता त्यांचा ठराव आपण वाचून वारंवार त्यामध्ये म्हटल होत एक टी.डी.आर आम्ही दिला रस्ते बांधकाम, करायला आपण त्याचे कोर्टाला ॲफेडेव्हीट केले आणि व्हीच एव्हर ईज लेस म्हणजे आम्हाला खर्च कमी येईल, महापालिकेला खर्च कमी येईल त्याला एक टी.डी.आर दिला ना साहेब त्यांनी १० करोड खर्च केला असेल तर डी.एस.आर प्रमाणे ७ करोड आहे तर त्याला ७ करोड दिला असेल. तेव्हा दोन करोड आहे आपण लेस दिल. आता शासनाने घेतलेला आहे त्याचे सव्वा द्यायचे आहे म्हणजे १.२५ म्हणजे भविष्यात म्हणजे जे १ फूट बांधकाम करणार त्यावेळी त्याला सव्वा टी.डी.आर द्यावे लागेल. १० फुट केले तर साडे बारा फूट द्यायचं आपण मध्येच ठराव करुन शासनाला आपण पाठवलं आताच जो आता आपण आणला आपल्या माहितीसाठी मी जस्ट आरोप प्रती आरोप सत्ताधाऱ्यांनाच झाले म्हणून आम्ही याचे उत्तर देतो नाहीतर या विषय धरुन विषय नाही हे आणि आपण मॅडम पॉईंट सेव्हनफाईव्ह के पॉईंट एकच दिला आहे ते पण यासाठी द्यावे लागले कारण त्या लोकांनी

त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी सगळे पत्र देऊन रस्ते बांधून मोकळे झाले. त्यावेळी आपल्याला द्यायची गरज नव्हती त्याचवेळी विषयावरुन अनेकदा विरोध केला होता पण आपल्याने दिले उदाहरण स्मार्ट कॉम्प्लेक्स झाल तुम्ही केल म्हणून आम्हाला भोगाव लागतो. आम्ही दिले २० कोटी अजून लागेल तर दिले कारण आपण ते सुरु केले आम्ही त्यांनी सांगितले होते करुन नका पैशांनी आपण केल आम्ही देतो आता पैसे तसेच या प्रकारचा अनेक बाबी आता कोणावरती टिका टिप्पणी करायची पाळी नाही. या शहराला विकसित कसं करता येईल त्यासाठी आम्ही आमचा निर्णय घेत असतो. महापौर मॅडम, आम्ही या विषयावर ठराव मांडला दुसरा विषय घ्यावा.

**जुबेर इनामदार :-**

त्याचे स्पष्टीकरण तर द्यावे लागेल ना प्रशासनाच्या समोर आणावा लागेल. या विषयावर आयुक्तांनी उत्तर द्यावे. प्रशासनाचे काहीतरी उत्तर असेल ना निवेदन त्यांनी करावे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, दोन मिनिटे ऐकून घ्यावे नंतर आयुक्तांनी त्याला रुलींग द्यावे माझे एक म्हणणे आहे. नाही शॉर्टकटमध्ये बोलतोय की मेहता साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आज आपण ८ करोड रुपया राहून मिरा भाईंदर रेल्वे स्टेशनचे सुशोभिकरण करतोय आयुक्त महोदय शॉपिंग सेंटरमध्ये आता नव्याने एक संघटना स्थापन झालेली आहे. त्या युनियननी आपल्या त्या कामावरती स्टे आणला आज त्या शॉपिंग सेंटरमध्ये अनधिकृत बार, अनधिकृत लॅन्ड आहेत. आज त्यांना इंटरनेट चेंजिंग करायची असते तर ती संस्था त्या शॉप मालकांकडून एन.ओ.सी. साठी पैसे घेते याच्याही पुढे जाऊन सांगतो डी.पी. रोड आपण त्या ठिकाणी काढतो त्या डी.पी. रोडची जागा हे लोक पे अॅन्ड पार्क म्हणून यूज करतात. कोणी दिली त्यांना जागा आज खांबित साहेबांना विचारा ज्या वेळेला आम्ही जागेची पाहणी केली आज त्या ठिकाणी ५००-६०० मोटर सायकल ठेवल्या जातात. एखादा नागरिक सकाळी मोटरसायकल सोडून गेला तर त्या मोटरसायकलला लॉक लावलं जाते आणि संध्याकाळी तो आला की २०० रुपये द्या तरच ती गाडी खोलली जाते यांना कोणी परवानगी दिली साहेब डी.पी. रोडवरती या लोकांनी आपल्याच रस्त्यावरती आपल्याच डी.पी. रस्त्यावरती या लोकांनी पे अॅन्ड पार्क सुरु केल म्हणजे एवढी त्यांची शॉपींग सेंटर वाल्यांची दादागिरी आज तो प्रभाग माझ्या नगरसवक वॉर्डात निगडीत असल्यामुळे मी बोलतोय साहेब आणि दुसरी गोष्ट इंटरनेट चेंजेस जे पॅसेज दिलेले आहेत फस्ट फ्लोअरवरती महापौर मॅडम त्या पॅसेजमध्ये पूर्ण बार काढले गेले आहेत. आज त्या ठिकाणी चांगले क्लासेस चालतात पण आयुक्त महोदय यांनी हे बार आणि लॉजेस जे काही अनधिकृत चालू केलेले आहेत पूर्ण पॅसेज जो त्यांनी कव्हर केला जो व्यापलेला आहे त्यामुळे इकडे दलालांचा सुळसुळाट पण तिकडे चालू झालेला आहे. आणि त्यामुळे ये जा येता जाता नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. आणि जो डी.पी. रोडवरती सार्वजनिक बांधकामाचे खांबीत साहेबांना विचारा साहेब ती पूर्ण जागा त्यांनी व्यापलेली आहे आणि त्या जागेवरती पे अॅन्ड पार्कसाठी कोणी दिली साहेब ती जागा तातडीने याच्यावरती कारवाई करावी अशी आपणांस विनंती करतो. धन्यवाद.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम अनधिकृत बांधकामावरती बऱ्याच प्रमाणामध्ये सभागृहामध्ये जी आता चर्चा झालेली आहे त्या अनुषंगाने अनिल भोसले साहेब माझी विनंती आहे आपल्याला मी बोलत असताना प्लीज आपण बसावे. त्या अनुषंगाने मी सभागृहाला या ठिकाणी मी सांगु इच्छितो की अनधिकृत बांधकामावरती अजिबात कारवाई होत नाही या मताशी मी सहमत नाही. आज आता सभागृह या ठिकाणी चालू आहे. ३३३ रिझर्व्हेशन महानगरपालिकेचा आहे म्हणजे अनेक मालकांची म्हणून त्याठिकाणी जमिन त्याच्यामध्ये आलेली आहे. बऱ्याच लोकांनी त्या ठिकाणी स्वतःची दुकान थाटलेली होती आणि त्याची डिमॉल्यूशनची कारवाई आता सध्या चालू आहे म्हणजे अजिबात कारवाई होत नाही या मताशी सहमत नाही कारण वेळोवेळी कारवाई केली जाते ठोस प्रमाणामध्ये कारवाई झाली नाही या मताशी मी सहमत आहे. माझ्याकडे कर्मचाऱ्यांचा स्टाफ कमी आहे तेच ते अधिकारी आहेत अनेक वेळा अधिकाऱ्यांची कमतरता असल्यामुळे आपण अधिकारींची मागणी केली पण शासनाकडेच अधिकारी कमी असल्यामुळे ते अधिकारी भेटत नाही आणि मी सभागृहाला हे आश्वासन देऊ इच्छितो. आता जी काही खंत व्यक्त करण्यात आली कृपा करुन याच्यानंतर जी काही अनधिकृत बांधकामावरती कारवाई होईल त्याच्यामध्ये सत्ताधारी किंवा विरोधक नगरसेवकांनी जर मला इंटरफेअर करण्याचा जर प्रयत्न केला तर आपले नगरसेवक पदाबद्दल आपल्याला विचार करुन इंटरफेअर करावं याच्यानंतर १०० टक्के कारवाई व्यवस्थित करण्यात येईल याची मी आपल्याला दखल घेतो आणि आता जे सांगितल की शांतीनगर आपले शॉपिंग सेंटरच्या बाबतीमध्ये आणि मिरारोड स्टेशनच्या समोर जे काही प्रकार चालु आहे अनधिकृत बऱ्याच लोकांनी पुढे शेड थाटलेले आहे. आमचा डी.पी. रोड पण बाधीत केलेला आहे. आता तरी साहेबांनी सांगितले की तिथे पार्किंगच ग्राऊंड आमच्या मालकीचे जे आहे त्यांनी हे केलेले आहे. आणि शांती बिल्डरला आपण त्यांना सांगून त्याठिकाणी त्याचे ऑफीस काढायला लावल आणि बाकी पूढच्या सोसायटीवाले लोकांनी काहीतरी स्थगिती आणल्या स्थगिती आणली म्हणजे फार काही मोठ काम केल अशातला विषय नाही आम्हाला स्पेशल यू पिटीशन त्याच्यामध्ये विशेष लक्ष देऊन करून ते ताबडतोब स्टे हटवून त्याच्यावरती कारवाई करण्यात येईल एवढे मी सभागृहाला सांगू इच्छितो आणि पुढचा विषय महापौर मॅडमने घ्यावा.

**प्रकरण क्र. १२४ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट.

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा-भाईंदर मनपा हद्दीत अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामात मोठ्या प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्या बाबत थातुर-मातुर कार्यवाही होते. नुकताच दि. १९ नोव्हेंबर २०१५ रोजी दै. लोकसत्ता च्या अंकात "अनाधिकृत झोपड्यांवर कार्यवाहीचा देखावा" फोटो सहीत बातमी प्रसिध्द झाली आहे. तसेच दैनिक व स्थानीक दैनिक, साप्ताहीक मध्ये बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम संबंधीत बातम्या सतत प्रसिध्द होत असतात.

केंद्र व राज्य शासन, महानगरपालिकेच्या आरक्षणातील जमीनीवर, खाजगी, आदिवासी, CRZ बाधीत, ना विकास क्षेत्रात इत्यादि. जमीनीवर अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामे सर्रास व राजरोसपणे सुरु आहेत. केंद्र व राज्य शासनाचा जमीनीवर झोपड्या, चाळी, जुन्या गाळांच्या वाढीव बांधकाम, इमारतींच्या बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामांच्या बाबत असंख्य तक्रारी महानगरपालिका, विभाग प्रमुख, अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम नियंत्रण कक्ष तसेच प्रभाग अधिका-यांकडे येत असतात. तरी देखील कोणतीही ठोस कार्यवाही प्रशासनाकडुन होत नाही. मा. उच्च न्यायालय व मा. जिल्हा न्यायालय, ठाणे, यांच्याकडुन अनेक दाव्यांमध्ये स्थगिती आदेश ऊठलेली असले तरी प्रशासनाकडुन बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तसेच अतिक्रमण काढण्याची व पाडण्याची कार्यवाही होत नाही.

तत्कालीन आयुक्त श्री. विक्रम कुमार (भा.प्र.से) यांनी मिरा-भाईंदर शहरातील व राष्ट्रीय महामार्ग पट्टयातील बेकायदेशीर बांधकाम तोडण्यात आलेला होता त्यावेळी मेसर्स रिलायन्स एनर्जी यांनी दिलेला विज पुरवठा खंडीत करून मीटर काढ़ण्यात आले होते. परंतु पुन्हा प्रशासनाला हाताशी धरून सदर बेकायदेशीर बांधकामांना विद्युत पुरवठा देण्यास शिफारस करण्यात आलेली आहे. अनेक वेळा तक्रारदारांच्या तक्रारी नंतर नोटीस काढुन त्यांना मा. न्यायालयामधुन स्टे आणण्यासाठी संधी दिली जाते. महानगरपालिकेच्या विधी विभागाकडुन केवीयट मा. न्यायालयांमध्ये दाखल करण्यात येत नाही त्यामुळे बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम करणा-यांना स्टे मिळुन जाते व अनेकवेळा मनपाचे वकील देखील तारखेला गैर हजर असतात. अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार निरोधक ब्युरो ठाणे यांनी रंगेहाथ अटक केलेल्या प्रभाग अधिकारी यांना, तसेच प्रभाग अधिकारी हे अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्यास कसूर केल्याबद्दल त्यांना मा. आयुक्त यांनी निलंबीत केलेली आहे. असे असताना देखील पुन्हा त्याच अधिका-यांना अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, प्रभाग अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली या बाबत संपूर्ण शहरांमध्ये चर्चा व अनेक वर्तमानपत्रांमध्ये बातमी छापून आलेली आहे. अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्यास, मा. न्यायालयाच्या आदेश व शासनानी वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णय, शासन परिपत्रक, मा. महासभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आलेली ठराव तसेच तत्कालीन आयुक्त श्री राजीव रंजन जाधव साहेब यानी काढलेली कार्यालयीन आदेशाचे उल्लंघन, निष्काळजीपणे कर्तव्यात हयगय केल्याबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ५६ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

मिरा-भाईंदर मनपा हद्दीत केंद्र व राज्य शासनाच्या जमीनीवर मोठ्या प्रमाणामध्ये झोपड्या बांधुन विक्री केली जाते. या जमीनीवरील तिवरीचा झाडांवर (मॅन्ग्रोव्हस) कचरा व डेब्रीसचा भरावा करून, बांबू प्लास्टीक शीटनी जागा आढ़वून गरीब, कष्टकरी लोकांना फसवून विक्री केली जाते त्यामध्ये समाज कंटक, हाथ भट्टी दारू विक्री करणा-यांची टोळी, गुन्हेगारी प्रवृत्तींची माणसे तसेच बांगलादेशीय नागरीक वास्तव्य करीत असल्याचे दिसून येते. शासकीय जमीनीवर झोपड्या बांधून विक्री करणारे लोकांच्यावर स्थानीक पोलिस ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्या विरुध्द संगठीत गुन्हा कायद्यांतर्गत "झोपडपट्टी माफीया" म्हणून त्यांना मिरा-भाईंदर मनपा हद्दीतून हद्दपार करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींची माणसे यात आश्रय घेत असल्यामुळे मिरा- भाईंदर शहराला धोका निर्माण झाला आहे. उपरोक्त बाब अत्यंत गंभीर असून संबंधीत सर्व जबाबदार अधिकारी यांना जबाबदार धरून त्यांच्या विरुध्द मा. आयुक्त यांनी शिस्तभंग, कर्तव्यात हयगय, निष्काळजीपणा केल्याबद्दल कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२५, सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंह यांचा दिनांक २७/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ ची अंमलबजावणी करणेबाबत.

**मा. आयुक्त :-**

दुसरा एक मुद्दा मॅडम, आपण एक प्रश्न विचारला होता की आपली माहिती ६/११/२०१५ आणि १८/११/२०१५ रोजी तयार करुन ठेवण्यात आलेल्या पण आपण ती माहिती स्विकारलेली नाही. एका पत्रावर एक स्विकारली गेली मला कल्पना नाही.

**वर्षा भानुशाली :-**

सर ते वेगळे असेल. माझे पत्र १५/१० आणि ३०/१०.

**मा. आयुक्त :-**

३०/१० आणि १५/१० च्या पत्राच्या सूचनेमध्ये ६/११ ला ही माहिती तयार आहे. आमच्या डिपार्टमेंटला आपण ती कलेक्ट करावी आणि काही असेल तर आपण.

**नरेंद्र मेहता :-**

अधिकारी नसेल तर त्याच्यावर काय कारवाई करणार.

**अनिल भोसले :-**

महापौर मॅडम, कमिशनर साहेब आपण लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे कमिशनर साहेब.

**दिलीप घेवारे :-**

नाही साहेब, त्याला प्लींगची परमिशन दिलेली नाही. त्याची तपासणी करु आपण.

**नरेंद्र मेहता :-**

सी.सी. दोन एकाच बोलायचं नाही याच्याकडे त्याच्याकडे.

**दिलीप घेवारे :-**

ते साहेब असं नाही हे.

**नरेंद्र मेहता :-**

दोन सी.सी. कम्पलसरी एक माझ्याकडे आणि एक इनामजीकडे.

**दिलीप घेवारे :-**

असे नाही तो एफ.एस.आय. जो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

एका तत्वाची दोन सी.सी. यांच्यात पण बिल्डींगची परवानगी आणि ...........

**मा. आयुक्त :-**

खातरजमा झाल्यानंतर १०० टक्के कारवाई करण्यात येईल. मा. सदस्य आणि मा. आमदार साहेबांनी एक प्रश्न मला विचारला होता. त्याचे उत्तर द्यायचे राहून गेलेले आहे की सर प्रभाग म्हणजे प्रभाग अधिका-यांची जबाबदारी शासनाने निश्चित केलेली आहे. वेळोवेळी आपल्याकडे कर्मचा-यांची संख्या कमी असल्यामुळे तिथे अधिका-यांना परत सेवेमध्ये घेऊन मला नाईलाजाने त्यांना त्या ठिकाण द्याव लागतं त्या कॅलीबरचे माणस नाहीत कारण एखाद्या समजा ज्युनिअर माणसाला चार्ज जर दिला ब-याच पेपरला उलटसुलट बातम्या येतात की या कर्मचा-यांना म्हणजे वर्ग तीनच्या कर्मचारी झाला अधिकारी वगैरे अशी काही प्रकार होतात. परंतु मी आपल्याला या ठिकाणी सांगु इच्छितो की, ज्या अधिका-यांना पुन्हा पुन्हा त्या कामासाठी निलंबित केलेले आहे आणि आता रस्ता रुंदीकरणाची जी आपल्याकडे ५-६ कामे चालू आहेत त्याच्यामध्ये काही कर्मचा-यांनी आपला रस्ता रुंदीकरणाचा गैर फायदा घेऊन त्या ठिकाणी मी स्वतः परवाच्या दिवशी शुक्रवारी, शनिवारी पाहणी केली आणि माझ्या अशा निदर्शनास आलेले आहे की त्या रस्ता रुंदीकरणाचा गैर फायदा घेऊन ज्या लोकांचा रस्त्यामध्ये जागा गेली त्यांना रितसर आम्ही टी.डी.आर देत आहोत. परंतु काही लोकांनी त्याचा गैरफायदा घेऊन काही गरीब माणस आहेत की वर्षवर्ष त्या ठिकाणी बसत आहेत. आणि १० बाय १५ ची जागा आहे तर अशा माणसांच एका लेडीजच वय ५०-५५ वर्ष होत आणि ती बाई रडू लागली तर मी तुमचा घर जाऊ देणार नाही तुम्हाला ह्या ठिकाणी घराची व्यवस्था करून मला वाटते म्हात्रे साहेबांचा वॉर्डातला विषय येतो. आणि त्या रोडच्या साईटला मग मी त्यांना सांगितले की तुमची किती फुट जागा राहते.१० फूट जागा राहते त्यांना मी काही तरी ॲडजेस्टमेन्ट म्हणून म्हणाला होतो किंवा १० फूट राहते तर तुम्ही बांधून घ्या. तुम्हाल रिप्लेअर परमिशनमध्ये मी ॲडजेस्टमेन्ट करेल म्हणून परंतु त्याचा गैरफायदा घेऊन काही लोकांनी जागा जाते आता आपल्याला टी.डी.आर कमी भेटणार म्हणजे आपल्याला टी.डी.आर कमी भेटेल म्हणून काही बरेचसे म्हणजे अनधिकृत बांधकाम केलेले आहे त्याची यादी पण मी केलेली आहे आण उदया परवा तो तोडण्याची कारवाई आम्ही चालू करत आहोत म्हणजे मला वाटते ७-८ बांधकाम काही तरी माझ्या निर्दशनास आलेली आहेत त्याच्या व्यतिरिक्त जी काही बांधकाम प्रभाग समितीमध्ये आहेत तर त्या अधिका-यावरती सर आपण म्हणजे जी कारवाई करणार आहोत ते मी याच्यानंतर ज्या अधिका-यांनी जर समजा माझ्या आदेशा प्रमाणे कारवाई केली नाही तर यांच्यावरती गुन्हे दाखल करून यांना निलंबीत करून बत्तर करण्यासाठी ही महासभेकडे शिफारस करेल असे आश्वासन या ठिकाणी देतो.

**जुबेर इनामदार :-**

विषय राहीला डी.पी.चा सी.सी. रोडला तुम्ही टी.डी.आर दिलेला आहे एका विशेष व्यक्तिला अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्यासाठी प्रशासनाने केलेली मदत हा माझा आरोप आहे.

**मा. आयुक्त :-**

अनधिकृत बांधकामासाठी शासनाने अशाप्रकारे मदत कधीही करणार नाही कायदयाच्या चौकटीत बसूनच करणार आणि आपण जो मिक्सिंग केल माझी एक सभागृहाला विनंती आहे एखादया विषयावर समजा अनधिकृत बांधकामाचा विषय जर चालू असेल तर त्या अनधिकृत बांधकामावरच सर्वानी बोलाव म्हणजे आम्हालाही कळेल की काय उत्तर द्यायचं अनधिकृत बांधकाम, त्याच्यानंतर शॉपींग सेंटर आल, त्याच्यानंतर टी.डी.आर आला, त्याच्यानंतर पाणी पुरवठा आला, त्याच्यानंतर एम.एम.आर.डी.ए. आला काय उत्तर द्यायचं आपल्यालाही कळत नाही. तुम्ही आम्हाला काय विचारतात.

**जुबेर इनामदार :-**

पद निश्चित अधिकारी प्रभाग क्रमांकाचा आणि त्यांनी मला उत्तर दिलेला आहे केलेले बांधकाम.

**भगवती शर्मा :-**

तोच विषय आहे त्याचा उत्तर दिला नाही म्हणून त्यांनी बोलले.

**मा. महापौर :-**

आप विषय चेंज कर रहे है, आप प्लीज बैठ जाईए।

**मा. आयुक्त :-**

आपण जो काही प्रश्न विचारला आहे त्याच्याबद्दल आपल्याला यापूर्वी लेखी उत्तर देण्यात आलेले आहे आणि काही पूरा प्रशासनात माहिती देण्यात येईल.

**जुबेर इनामदार :-**

हा पूर्ण शहराचा विषय आहे.

**अनिल भोसले :-**

आरक्षण क्र. ३६५ मध्ये खेळाचं मैदान आपण शाळा आपण स्वतः खांबित साहेबांनी व्हिजिट केली होती, त्या व्हिजीटच्या ठिकाणी त्या शाळेच्या जागेवर काही पार्टीचे बोर्ड, काही झेंडे लावण्यासाठी कारवाई आपण त्वरीत जगदाळेला सांगितले की कारवाई करा म्हणून आरक्षण क्रमांक ३६५ त्या जागेमध्ये जगदाळेंना आपण आदेश दिल्यानंतर झेंडा काढला, परत त्या ठिकाणी बोर्ड लावले, परत त्या ठिकाणी वाचनालय बनवलं ते काढलं पण नाही उलट उत्तर पाठवून दिलं त्या ठिकाणी कुठलेच अतिक्रमण निदर्शनात येत नाही. अशी परिस्थिती आहे. ही आपली महापालिकेची आरक्षित जागा आहे. कमिशनर साहेबांनी आदेश देऊन सुध्दा ही परिस्थिती आहे.

**मा. आयुक्त :-**

अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करताना विचार करायला पाहिजे होता आणि याचे उत्तर दिले आहे कारवाई करणार म्हणून.

**जुबेर इनामदार :-**

मला जी अपेक्षा होती तेच झालं, उत्तर मला प्राप्त होणार नाही राईटिंगमध्ये मला जे दिलेले आहे ते थातूर-मातूर आहे.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल भोसले :-**

महापालिकेच्या आरक्षण जागेमध्ये असलेल्या अतिक्रमण हटल की नाही हटल. आपण आदेश देऊन हटवले नाही. उलट मिसगाईड केले गेले त्याठिकाणी परत दोन बोर्ड लागले.

**मा. आयुक्त :-**

पाच मिनिटांपूर्वी मी काय सभागृहाला उर्दुत सांगितल नाही मराठीमध्ये सांगितले की अतिक्रमणवर कारवाई करण्यात येईल म्हणून.

**अनिल भोसले :-**

कमिशनर साहेब आपण आदेश देऊन सुध्दा झालेले नाही. कमिशनर साहेब आपले अधिकारी ऐकत नाहीत, आपण सांगून सुध्दा ऐकले नाही.

**मा. महापौर :-**

भोसलेजी आपको अभी अभी आश्वासन दिया है की, हो जाएगा प्लीज बैठ जाईए।

**अश्विन कासोदरिया :-**

महापौर मॅडम, कमिशनर साहेब आज एक विषय आया था। ४-६ महिने पहिले थाना के अंदर जो नगरसेवक बांधकाम हो रहा था। उसके अंदर इंडेस्ट होई और वह साबीत हुए। उसे सस्पेंड किया जाए वैसा भी यहाँ पर कारवाई होनी चाहिए। जो नगरसेवक इंटरफिअर करते है अनधिकृत बांधकाम के अंदर अटका हुआ काम शुरा होता है। उसको आप सस्पेंड करे।

**मदन उदित नारायण सिंग :-**

प्रकरण क्र. १२५ विषय महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ ची अंमलबजावणी करण्यात आली ‘‘ज’’ चा प्रस्ताव महापौर मॅडम, आयुक्त महोदय, जैसे भी सुबह से हम लोग देख रहे है, जितने भी विषय

अए वह विषय कोई साहेब के लिए महासभा के लिए नया नही है। और आयुक्त साहब मैं २००२ से लगातार तिसरा टर्म है मेरा और हर महासभा में हर महापौर के रहते हर आयुक्त बदली होती है, यहॉ विषय आते है। सब सुबह से जितने विषय आए और मुझे लगता है, जब तक चाँद सुरज रहेगा तबतक ऐसाही चलेगा। ऐसा ही चलेगा मतलब कुछ काम नही होगा तो हम आयुक्त साहब अगर किसी एक दुसरे पे प्रस्ताव होता है और उसपर अंमलबजावणी हो जाए तो वापस वह चर्चे पर नही आएगी सर। मेरा कहने का मतलब देखीए आयुक्त साहब आपने मजाक में लिया लेकिन मैं सिरियस हूँ। एक फेरिवाला का विषय, एक लॉजिंग का विषय, एक अतिक्रमण का विषय और लोगो का जो काम नही होता है हमारी सुनीए तो सही।

**मा. आयुक्त :-**

मदनसिंगजी यह विषय पे मैंने रुलिंग दिया है। बाद में बार-बार विषय निकालेंगे तो दिनभर यह सभा चलेगी।

**मदन उदित नारायण सिंग :-**

मेरा विषय है।

**मा. आयुक्त :-**

सर सभागृह की बात होने के बाद में यह विषय पे रुलींग दिया फिर आप इधर से चालू हुए उधर से चालू हुए।

**मदन उदित नारायण सिंग :-**

आपने जो रुलिंग दिया है, वही रुलिंग १५ साल से सून रहा हूँ साहब लेकिन उसपर कारवाई नही होती, अंमलबजावणी होत नाही साहेब. म्हणून आम्हाला कराव लागतं. म्हणजे माझं म्हणणे एवढच की आपण जे रुलींग देता, किंवा आम्ही जो प्रस्ताव आणतो किंवा प्रभाग समिती म्हणजे ठराव होतात त्याच्यावर फक्त रुलींग रुलींग जसं कुठलं पिक्चरमध्ये होत ना तारीख,तारीख अंमलबजावणी होत नाही अंमलबजावणी झाली पाहिजे साहेब आता एक उदा. देतो.

**मा. आयुक्त :-**

मदनसिंग साहेब आता मी तुम्हाला डॉक्युमेंटरी प्रुफ एवढ देऊ शकतो की ह्या महापालिकेत मला येऊन ११ महिने झाले त्या ११ महिन्यात आपल्या शहरामधली काय-काय कामं चालू झालीत याची मी यादी देऊ शकतो आपल्याला याची अंमलबजावणी होत नाही होत नाही असे म्हणणे उचित नाही तुमचं या सभागृहामध्ये अनेक ठराव पास झालेत त्याची अंमलबजावणी केली त्याची मी तुम्हाला यादी देऊन टाकतो. एक पत्रकार परिषद घेऊन आम्ही आतापर्यंत काय-काय केले ते सर्व सांगुन देऊ. म्हणजे सगळ्या शहराला एकदा कळून जाऊ दे की, आपण काय काम केलेले आहे. आणि आम्ही एवढ्या स्पिडमध्ये काम करत असताना आपण जर म्हणत असाल की काही काम होत नाही अंमलबजावणी होत नाही दॅट इज रॉंग.

**मदन उदित नारायण सिंग :-**

साहेब त्याबद्दल तुमचे धन्यवाद. मी पण प्रेस कान्फरन्स करुन एक यादी देऊ शकतो की आमच्याकडे एवढी यादी त्याच्यावर काहीच काम अंमलबजावणी झाली नाही मग काय करु आपण, माझ्याकडे पण तशी यादी आहे. साहेब आमचे म्हणणे एवढच ऐका फक्त.

**मा. महापौर :-**

जुबेरजी आप बैठ जाईए अगर आप एकबार नही बैठेंगे तो मुझे आपको निलंबीत करना पडेगा। आप बैठ जाइए आपको जवाब मिल गया है।

**भगवती शर्मा :-**

मॅडम इधर से कोई भी खडे होते है तो बैठ जाईए।

**मदन उदित नारायण सिंग :-**

हमारा कहना इतनाही जो हम लोग।

**मा. महापौर :-**

मदनजी आप अपना विषय बोलीए।

**मदन उदित नारायण सिंग :-**

महापौर मॅडम, जो ठराव होतो आमचा किंवा प्रस्ताव येतो, एक माझं अस म्हणणे आहे की, एक सक्षम अधिकारी नेमण्यात यावे त्यांच्याकडे सर्व यादी राहील आणि कुठल्या प्रस्तावावर अंमलबजावणी झाली का नाही ही कारवाई करण्यात यावी की आपल्याला पण माहित पडेल आम्हाला पण माहित पडेल. आज मी प्रस्ताव मांडतो, ठराव मांडतो. आता महाराष्ट्र सरकारनी जो लोकसेवा हक्क अध्यादेश आणला आहे. त्याच्यावर मी एक ठराव मांडतो. महाराष्ट्र लोकसेवा अध्यादेश २०१५ नुसार नागरिकांच्या सेवेच्या अनुषंगाने संबंधित विभाग प्रमुखाने आवश्यक ती कारवाई मुदतीत पूर्ण करण्याकामी क्रमप्राप्त असुन याबाबत मा. आयुक्त महोदय मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी जा.क्र.मनपा/७२८/२०१५-१६ गेल्या ७/०७/२०१५ रोजी प्रसिध्द आधी सुचना प्रसिध्द केलेली आहे. त्या प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेची अंमलबजावणी विहित मुदतीत न केल्यास सदर अधिकाऱ्यांवरती ५६ खाली कारवाई करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**दिपिका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १२५ :-**

सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंह यांचा दिनांक २७/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ ची अंमलबजावणी करणेबाबत.

**ठराव क्र. ९६ :-**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ नुसार नागरीकांच्या सेवेच्या अनुषंगाने संबंधित विभाग प्रमुखांनी आवश्यक ती कार्यवाही मुदतीत पूर्ण करणे क्रमप्राप्त असून याबाबत मा. आयुक्त महोदय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी जा.क्र.मनपा/सा.प्र./७२८/२०१५-१६, दि. ०७/०७/२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेची अंमलबजावणी विहित मुदतीत न केल्यास सदर अधिका-यांवरती ५६ खाली कारवाई करण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह** **अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२६, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास शंकर पाटील यांचा दिनांक ३०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व मनपा शाळांना सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणेबाबत.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. १२६, १२७ व १२८ हे तिन्ही विषय मागे घेत आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, मला उत्तर काय प्राप्त झालेच नाही. सभागृहामध्ये उत्तर मिळणारच नाही आम्हाला त्याचे.

**मा. महापौर :-**

ही सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा संपण्याची वेळ दु. १२.४० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका